दैनिक

# चकमक

संपादक : शामसुंदर चितोडा | कार्यकारी संपादक : कैलास फुलारी

✲ वर्ष : ०१ ले ✲ | ✲ अंक : ५२ ✲ | ✲ मंगळवार २२ सप्टेंबर २०२६ ✲ | ✲ जालना ✲ | ✲किंमत : २ रूपये ✲ | ✲पृष्ठे : ४ ✲

◎Volume 01◎ | ◎ Issue 52 ◎ | ◎ Tuesday, Date : 22 September 2026 ◎ | ◎ Jalna ◎ | ◎Price Rs. 2◎ | ◎Pages 4 ◎





## जालना शहरातील नागरिकांचा प्रवास होणार अधिक सुखकर व सुरक्षित; सिटी बससेवेला सुरुवात

जालना/प्रतिनिधी जालना शहरातील नागरिकांचा दैनंदिन प्रवास अधिक सुलभ, सुरक्षित आणि सोयीस्कर व्हावा, यासाठी शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत महत्त्वाची भर पडली आहे. आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या विशेष प्रयत्नातून जालना शहरात **सिटी बस सेवा सुरू करण्यात आली असून**, या बससेवेचा लोकार्पण सोहळा माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे पाटील आणि शिवसेना उपनेते तथा जालना विधानसभा मतदारसंघाचे आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. जालना शहरातील नागरिकांना सार्वजनिक वाहतुकीची अधिक सक्षम आणि परवडणारी सुविधा उपलब्ध व्हावी, शहरातील विविध भागांमध्ये प्रवास करताना नागरिकांना अडचणी येऊ नयेत, यासाठी आमदार अर्जुनराव खोतकर यांनी सिटी बससेवा सुरू करण्यासाठी राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे मागणी केली होती. त्यांच्या या मागणीला सकारात्मक प्रतिसाद मिळाल्यानंतर जालना




शहरात सिटी बससेवा सुरू करण्यात आली. नागरिकांच्या प्रवासाला मिळणार मोठा दिलासा शहरातील विविध भागांना जोडणाऱ्या या बससेवेमुळे विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक, कर्मचारी, रुग्ण, व्यापारी तसेच दैनंदिन कामानिमित्त शहरात प्रवास करणाऱ्या नागरिकांना मोठा फायदा होणार आहे. सार्वजनिक वाहतुकीची सुविधा उपलब्ध झाल्यामुळे नागरिकांना प्रवासासाठी अधिक सोयीचा आणि परवडणारा पर्याय मिळणार असून, जालना शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम होण्यास मदत होणार आहे. जालना ते इंदेवाडी, जालना (पान ३ वर)

## पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांनी घेतला जिल्ह्यातील पाणीटंचाई व चारा उपलब्धतेचा दूरदृश्यप्रणालीद्वारे आढावा




जालना,दि.२१(जिमाका) : जालना जिल्ह्यातील सर्व जलस्रोतांची सद्यस्थिती, उपलब्ध पाणीसाठा आणि संभाव्य वापराचे तातडीने लेखापरीक्षण करून पुढील ऑगस्टपर्यंतचा पाणीपुरवठा आराखडा तयार करावा. नागरिकांसह पशुधनासाठी पाणी आणि चाऱ्याची उपलब्धता यांना सर्वोच्च प्राधान्य द्यावे, असे निर्देश जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री तथा पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी दिले. पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांनी दूरदृश्यप्रणालीद्वारे जालना जिल्ह्यातील पाणीटंचाई आणि चारा उपलब्धतेचा आढावा घेतला. यावेळी जालना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कृष्ण कांत कनवारिया, अप्पर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी गहिनीनाथ कापसे यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. जालना जिल्ह्यातील धरणे, तलाव, विहिरी, लघुपाटबंधारे आणि अन्य नैसर्गिक जलस्रोतांतील पाणीसाठ्याचे लेखापरीक्षण पुढील बैठकीपूर्वी पूर्ण करण्याचे निर्देशही त्यांनी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांना दिले. जायकवाडी प्रकल्पातून होणाऱ्या उचल पाणीपुरवठ्याची स्थिती आणि अंबड व जालना शहरांना उपलब्ध होणाऱ्या पाण्याचा कालावधी यांचा अचूक अंदाज घ्यावा. सध्याचा पाणीसाठा मार्चपर्यंत पुरण्याची शक्यता असली, तरी पुढील पावसाळ्यापर्यंत पाणी उपलब्ध न झाल्यास निर्माण होणाऱ्या परिस्थितीचा विचार करून पर्यायी नियोजन करावे, असे (पान ३ वर)

## मुख्यमंत्री पशुधन उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यशाळेचे प्रमाणपत्र वितरण व समारोप

जालना : प्रतिनिधी : मुख्यमंत्री पशुधन उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यशाळेत सहभागी झालेल्या प्रशिक्षणार्थींसाठी आयोजित पाच दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमाचा सांगता सोहळा व प्रमाणपत्र वितरण सोहळा नुकताच उत्साहात पार पडला. दिनांक २१ रोजी झालेल्या या कार्यक्रमात प्रशिक्षणार्थींना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून व मार्गदर्शन करताना माजी पशुसंवर्धन राज्यमंत्री तथा आमदार अर्जुनभाऊ खोतकर म्हणाले की, मुख्यमंत्री पशुधन योजनेचा लाभ केवळ प्रशिक्षणापुरता मर्यादित न ठेवता, प्रत्यक्ष प्रशिक्षण घेऊन सर्वांनी शेतीपूरक व्यवसाय सुरू करावा. तसेच महिलांनी दुग्धोत्पादन, शेळीपालन आणि कृषी प्रक्रिया उद्योग सुरू करून आपल्या कुटुंबासाठी व समाजासाठी शाश्वत उपजीविकेचे साधन निर्माण करावे, असे मोलाचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

मान्यवरांचे मार्गदर्शन व उपस्थिती:

या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून शिवसेनेचे जिल्हा संपर्क प्रमुख भास्करराव आंबेकर, उद्योजक विष्णूभाऊ पाचफुले यांच्यासह यशदाचे वरिष्ठ प्रशिक्षक संतोष दाभाडे यांची विशेष उपस्थिती होती. उपस्थितांना



मार्गदर्शन करताना त्यांनी ग्रामीण भागात कृषी प्रक्रिया उद्योग सुरू करण्याच्या संधी आणि त्याचे महत्त्व विशद केले. सत्कार व विशेष मनोगत: कार्यक्रमाच्या प्रारंभी सर्व प्रमुख पाहुण्यांचा पुष्पगुच्छ व सत्कार युवाशक्ती बिझनेस सोल्युशन्सचे संचालक अमोल खरात यांनी केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व भूमिका धरती-धन स्वावलंबी शाश्वत उद्योजकता विकास अभियानाचे संस्थापक मिलिंद सावंत यांनी मांडली, तर उपस्थितांचे आभार युवाशक्ती बिझनेस सोल्युशन्सचे संचालक अमोल खरात यांनी मानले. या संपूर्ण प्रशिक्षण कार्यक्रमास जिल्ह्यातील प्रशिक्षणार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. स्वावलंबी शाश्वत उद्योजकता अभियान महाराष्ट्र व युवाशक्ती बिझनेस सोल्युशन्स यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्यातील तमाम पशुपालक, महिला बचत गट आणि युवकांना आवाहन (पान ३ वर)

## विष्णू पाटील कोल्हे यांच्या निवासस्थानी रावसाहेब पाटील दानवे यांची सदिच्छा भेट

नवनाथ गव्हाणे बदनापूर / प्रतिनिधी

रोषणगाव पंचायत समिती गणाचे माजी पंचायत समिती सदस्य तसेच धोपटेश्वर ग्रामपंचायतीचे माजी सरपंच विष्णू पाटील कोल्हे यांच्या निवासस्थानी माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे दादा यांनी सदिच्छा भेट दिली. यावेळी दानवे यांनी कोल्हे कुटुंबीयांशी संवाद साधत विविध विषयांवर चर्चा केली. या भेटीदरम्यान स्थानिक



राजकीय, सामाजिक तसेच परिसरातील विविध प्रश्नांवरही चर्चा झाल्याचे सांगण्यात आले. यावेळी विष्णू पाटील कोल्हे व कुटुंबीयांच्या वतीने रावसाहेब दानवे यांचे स्वागत करण्यात आले. या सदिच्छा भेटीमुळे परिसरातील कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

## घनसावंगी येथे भारतीय बौद्ध महासभेची जिल्हास्तरीय बैठक उत्साहात संपन्न



घनसावंगी/प्रतिनिधी : भारतीय बौद्ध महासभा, जालना जिल्हा पूर्व विभागाची जिल्हास्तरीय बैठक दि. २० सप्टेंबर २०२६ रोजी घनसावंगी येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. बैठकीस राज्यसंघटक तथा जालना जिल्हा निरीक्षक आदरणीय किशोर जोहरे यांची प्रमुख उपस्थिती होती. बैठकीच्या अध्यक्षस्थानी जालना जिल्हाध्यक्ष महेंद्र बनकर होते. भारतीय बौद्ध महासभेच्या जालना जिल्हा पूर्व विभागाच्या संघटनात्मक कार्याचा आढावा घेण्यासाठी ही जिल्हास्तरीय बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीस जिल्हा कार्यकारिणीतील पदाधिकारी तसेच अंबड, घनसावंगी, परतूर आणि मंठा तालुक्यांचे अध्यक्ष व तालुका कार्यकारिणीतील पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी संघटनेच्या मिशन २०२५ यासह, संरक्षण, पर्यटन विभागच काम तसेंच विविध उपक्रमांचा आढावा, तालुकानिहाय संघटनात्मक कामकाज, ग्रामस्तरावर धम्मप्रचार-प्रसार वाढविणे, बुद्ध विहारांच्या माध्यमातून सामाजिक व धम्मविषयक उपक्रम राबविणे तसेच आगामी काळातील संघटनात्मक नियोजन याबाबत चर्चा करण्यात आली. राज्यसंघटक तथा (पान ३ वर)

## कारची काच फोडून लंपास केलेल्या १० लाखांपैकी ६ लाखांची रोकड जप्त ; आंध्र प्रदेशातील संशयिताच्या घरातून रक्कम हस्तगत; न्यायालयाच्या आदेशाने कोल्हे यांना सुपूर्द

बदनापूर / प्रतिनिधी : बदनापूर शहरातील एसबीआय बँकेतून १० लाख रुपये काढून कारमधून जात असलेल्या विष्णू कुंडलिकराव कोल्हे यांच्या कारची काच फोडून रोकड लंपास करणाऱ्या चोरट्यांचा बदनापूर पोलिसांनी छडा लावला आहे. सीसीटीव्ही फुटेज व तांत्रिक तपासाच्या आधारे पोलिसांनी आंध्र प्रदेशातील दोन संशयित आरोपींची ओळख पटवली असून, त्यांच्या राहत्या घरातून चोरीस गेलेल्या सहा लाख रुपयांची रोकड जप्त केली आहे. विष्णू कोल्हे यांनी ४ सप्टेंबर २०२६ रोजी बदनापूर येथील एसबीआय बँकेतून १० लाख रुपये काढले होते. त्यानंतर ते कारने धोपटेश्वरकडे जात असताना चोरट्यांनी त्यांच्या वाहनाचा मोटारसायकलवरून पाठलाग केला. धोपटेश्वर-देवगाव रोडवरील धोपटेश्वर शिवारात कोल्हे यांनी कार उभी करून शेतात गेल्याची संधी साधत चोरट्यांनी कारच्या मागील दरवाजाची काच फोडली आणि आतील रोकड घेऊन पोबारा केला. घटनेची माहिती मिळताच विष्णू कोल्हे यांनी बदनापूर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिस निरीक्षक एम. टी. सुरवसे यांनी तत्काळ तपासाची सूत्रे हाती घेत दोन तपास पथके तयार केली. सीसीटीव्ही फुटेज व तांत्रिक तपासातून चोरट्यांनी मोटारसायकलवरून कारचा पाठलाग केल्याचे समोर आले. तपासादरम्यान गुंजी चालराजु जबराज व गुड्डेटी विनोत प्रभुदास, दोघेही रा. कपरला टिपा, ता. बिटरगुंटा, जि. नेल्लोर, आंध्र प्रदेश, अशी संशयितांची नावे निष्पन्न झाली. आरोपींच्या अटकेसाठी बदनापूर पोलिसांचे पथक आंध्र प्रदेशात रवाना झाले; मात्र आरोपी पोलिसांच्या हाती लागले नाहीत. दरम्यान,



त्यांच्या राहत्या घरातून चोरीस गेलेल्या सहा लाख रुपयांची रोकड जप्त करण्यात पोलिसांना यश आले. न्यायालयाच्या आदेशाने सहा लाखांची रक्कम कोल्हे यांना सुपूर्द जप्त करण्यात आलेली सहा लाख रुपयांची रक्कम दि. २१ सप्टेंबर २०२६ रोजी न्यायालयाच्या आदेशाने फिर्यादी विष्णू कुंडलिकराव कोल्हे यांना सुपूर्द करण्यात आली. यावेळी जालना जिल्ह्याचे अपर पोलिस अधीक्षक विक्रम साळी, उपविभागीय पोलिस अधिकारी अनंत कुलकर्णी, बदनापूर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक एम. टी. सुरवसे, हेड कॉन्स्टेबल लोखंडे व हेड कॉन्स्टेबल पी. के. गोलवाल उपस्थित होते. या कारवाईत पोलिस निरीक्षक एम. टी. सुरवसे, पोलिस उपनिरीक्षक एस. आर. कुकलारे, पोहेकॉ/६७१ ए. एस. दासर, पोको/२२७ भडांगे, पोको/३४२ पी. के. गोलवाल आणि पोको/१६९९ एस. जे. तडवी यांनी सहभाग घेतला. चोरीस गेलेल्या १० लाखांपैकी सहा लाख रुपये जप्त झाले असून, उर्वरित रक्कम व संशयित आरोपींचा शोध सुरू आहे.

## मौलिक लेखन आणि भाषिक कौशल्य आत्मसात केल्याने ग्रामीण विद्यार्थी यशस्वी होऊ शकतात



**किशोर मोरे**
**घनसावंगी प्रतिनिधी :**

मॉडेल कॉलेज, घनसावंगी येथे हिंदी विभागाच्या वतीने हिंदी दिवसाच्या निमित्ताने १५ ते २१ सप्टेंबरदरम्यान 'हिंदी सप्ताह समारोह' आयोजित करण्यात आला होता. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आनंद देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली विविध साहित्यिक व सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

सोमवार, दिनांक २१ सप्टेंबर रोजी हिंदी सप्ताहाच्या समारोप सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या प्रमुख व्याख्यात्या आकाशवाणी, छत्रपती संभाजीनगरच्या माजी उद्घोषिका डॉ. संध्या मोहिते पाटील होत्या.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. संध्या मोहिते पाटील म्हणाल्या की, हिंदी भाषा राष्ट्राला एका सूत्रात जोडण्याचे कार्य करते. भाषा, साहित्य, संस्कृती आणि देश यांचा अनन्यसाधारण संबंध आहे. हिंदी भाषा केवळ भावनांची अभिव्यक्ती (पान ३ वर)

## वसंत नगर येथील आदर्श गणेश मंडळात 30 वर्षांवरील ५० नागरिकांची बीपी, शुगर तपासणी प्राथमिक आरोग्य केंद्र तळणीचा पुढाकार; विविध सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल

तळणी : प्रतिनिधी तालुक्यातील वसंत नगर (तळणी) येथील आदर्श गणेश मंडळाच्या वतीने आणि प्राथमिक आरोग्य केंद्र तळणीच्या संयुक्त विद्यमाने आज, २१ सप्टेंबर रोजी एका विशेष आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरामध्ये परिसरातील ३० वर्षांवरील ५० हून अधिक महिला व पुरुषांची बीपी (रक्तदाब) आणि शुगर (मधुमेह) तपासणी करण्यात



आली. गणेशोत्सवाच्या धामधुमीत आरोग्याची काळजी घेणाऱ्या या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. आरोग्य पथकाचे विशेष अभियान प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. वानखेडे आणि डॉ. श्रीमती भावसार यांच्या (पान ३ वर)

## जालन्यात २० क्विंटल तांदूळ जप्त; काळ्या बाजारात विक्रीचा संशय

जालना/प्रतिनिधी : हॉटेलच्या पाठीमागील पत्र्याच्या शेडवर छापा टाकून सुमारे २० क्विंटल तांदूळ जप्त करण्यात आला. जप्त करण्यात आलेल्या तांदळाची अंदाजे किंमत ८० हजार रुपये आहे. सदर धान्य काळ्या बाजारात विक्री करण्याच्या उद्देशाने साठवून ठेवल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. प्राप्त गोपनीय माहितीच्या आधारे २० सप्टेंबर रोजी रात्री ९ वाजता सदर ठिकाणी छापा टाकण्यात आला. यावेळी पत्र्याच्या शेडमध्ये ५० किलो वजनाचे एकूण ४५ तांदळाचे कट्टे आढळून आले. या तांदळाचे एकूण वजन अंदाजे २० क्विंटल असल्याचे नमूद करण्यात आले आहे. संशयावरून सदर मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई जिल्हाधिकारी आशीमा मित्तल, जिल्हा पुरवठा अधिकारी शशिकांत हदगल, जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली महेश थेरे, पुरवठा निरीक्षक, तहसील कार्यालय जालना आणि जिल्हा पुरवठा कार्यालयातील तहसीलदार **जालन्यात**

## गणेशोत्सवाच्या माध्यमातून 'लोकसंवाद-२०२६' उपक्रमाला नागरिकांचा प्रतिसाद

जालना/प्रतिनिधी : राज्य शासनामार्फत १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत सेवा संकल्प अभियान राबविण्यात येणार आहे. या अभियानाच्या अंतर्गतच महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनातील लोकसहभागाचा महत्त्वाचा उत्सव असलेल्या गणेशोत्सवाच्या माध्यमातून शासनाच्या विविध योजना, उपक्रम आणि धोरणात्मक निर्णयांची माहिती जनतेपर्यंत




थेट पोहोचविण्यासाठी माहिती व जनसंपर्क विभागाच्यावतीने राज्यभर 'लोकसंवाद-२०२६' हा विशेष जनजागृती उपक्रम राबविण्यात येत आहे. गणेशोत्सवाच्या माध्यमातून नागरिकांशी थेट संवाद साधत शासकीय योजना आणि उपक्रमांची माहिती पोहोचविणे हा या 'लोक(पान ३ वर)

# संपादकीय

## जीव गुदमरतोय

गेल्या काही वर्षांत शहराचा वेगवान विकास, बेसुमार काँक्रिटीकरण आणि हवामान बदलामुळे येथील पर्यावरण आणि नागरिकांच्या सुरक्षेवर थेट परिणाम होऊ लागला आहे. या धोक्याच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी 'क्लायमेट ॲक्शन नाऊ' ही मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेच्या केंद्रस्थानी तीन गंभीर मुद्दे आहेत – झाडे आणि खारफुटीची कत्तल, अति–काँक्रिटीकरण आणि वाढती उष्णता.सध्या मुंबई महानगर प्रदेशात विविध विकासकामे युद्धपातळीवर सुरू आहेत. आधीच मुंबईत जागेची कमतरता असल्यामुळे या विकासकामांच्या मार्गात येणारी झाडे तोडण्याचा सपाटा सुरू झालाय आणि हे कमी म्हणून की काय, तर आता मुंबईचे नैसर्गिक बचाव कवच असलेली खारफुटी हटवण्याचेही प्रयत्न सुरू झाले आहेत.खारफुटी ही काही केवळ झाडे नाहीत. ती मुंबई आणि ठाणे किनारपट्टीसाठी नैसर्गिक सुरक्षा कवच आहेत. भरतीच्या लाटा, चक्रीवादळ, किनारपट्टीची धूप आणि पूर यांपासून शहराचे रक्षण करण्याचे काम खारफुटीची झाडे करतात. सामान्य जंगलाच्या तुलनेत खारफुटी पाचपट अधिक कार्बन डायऑक्साईड शोषून घेतात आणि त्यांना वाढण्यासाठी सुमारे १०० वर्षे लागतात. मात्र आता विकासाच्या नावाखाली त्यांची मोठ्या प्रमाणावर कत्तल सुरू झाली आहे. वर्सोवा–भाईंदर किनारी रस्त्यासाठी तब्बल ४५,६७५ खारफुटीची झाडे तोडण्यास मंजुरी देण्यात आली आहे. तसेच मुंबई–अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पासाठी डहाणू ते आंबेसरी दरम्यान ८४७ खारफुटीची झाडे तोडण्याची परवानगी मागणाऱ्या याचिकेवर नुकतीच मुंबई उच्च न्यायालयात सुनावणी झाली.१४ जुलै रोजी मुंबई उच्च न्यायालयाचे प्रभारी मुख्य न्यायमूर्ती रवींद्र घुगे आणि न्यायमूर्ती गौतम अंखड यांच्या खंडपीठाने यावर तीव्र नाराजी व्यक्त केली. न्यायालय म्हणाले, मुंबईत आधीच ऑक्सिजन कमी आहे. जर हिरवे आवरण असेच कमी होत राहिले, तर तो दिवस दूर नाही जेव्हा लोकांना ऑक्सिजनचे शॉट घेण्यासाठी ऑक्सिजन सिलिंडर घेऊन फिरावे लागेल.भरपाई वनीकरणाच्या ढिसाळपणावरही न्यायालयाने बोट ठेवले. तुम्ही फक्त झाडे लावल्याचे चित्र तयार करता. ती जिवंत आहेत की नाही हे पाहायला तुम्ही मागे वळून पाहत नाही, असे निरीक्षण नोंदवत, खारफुटी जिथे तोडली तिथेच किंवा त्याच जिल्ह्यातील खराब झालेल्या खारफुटीच्या जमिनीवर भरपाई करावी, सोलापूरसारख्या दूरच्या ठिकाणी नव्हे, असेही न्यायालयाने स्पष्ट केले. दुसरा मुद्दा आहे काँक्रिटीकरणाचा. बेसुमार काँक्रिटीकरणामुळे पावसाचे पाणी जमिनीत मुरत नाही, त्यामुळे झाडांची मुळे गुदमरून झाडे मरतात. परिणामी, शहराचे तापमान वाढते. तसेच, मुळांना जमिनीत पसरण्यास जागा न मिळाल्याने वृक्ष उन्मळून पडतात. त्यामुळे जीवित व वित्तहानी उद्भवते. मार्च २०२५ मध्ये दाखल झालेल्या सर्वेक्षण अहवालाची दखल घेत २ जुलै २०२६ रोजी उच्च न्यायालयाने मुंबई महापालिकेला निर्देश दिले, की वृक्षांच्या डी–काँक्रिटायझेशनचे काम केवळ औपचारिकता म्हणून करू नये. वृक्ष कोसळून होणारे अपघात टाळण्यासाठी डी–काँक्रिटायझेशन अनिवार्य आहे, यावर न्यायालयाने भर दिला. याचिकाकर्त्यांनी आरोप केला, की महापालिकेने चुकीची माहिती देऊन न्यायालयात खोटी प्रतिज्ञापत्रे सादर केली आहेत. यावर उच्च न्यायालयाने महत्त्वाचे निर्देश दिले आहेत – कोणत्याही प्रकल्पासाठी संपूर्ण परवानगी एकत्र घ्यावी, तुकड्या–तुकड्याने नव्हे. झाडे तोडण्यापूर्वीच भरपाई वनीकरण करावे. खारफुटींचे जीआयएस मॅपिंग करावे, अशा सूचना न्यायालयाने केल्या आहेत. काँक्रीट, डांबर आणि हिरवळीचा अभाव यामुळे मुंबई अर्बन हीट आयलंड बनत चालली आहे. खारफुटी आणि इतर हिरवळ कमी झाल्याने शहरातील तापमान २ ते ३ अंशांनी वाढले आहे. याचा थेट परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होऊ लागला आहे. उष्माघात, श्वसनाचे आजार आणि पाण्याची टंचाई वाढू लागली आहे.'क्लायमेट ॲक्शन नाऊ' ही मोहीम चालवणाऱ्या नागरिकांचा मुद्दा हाच आहे, की विकास आणि पर्यावरण एकत्रितपणे पुढे नेणे गरजेचे आहे. न्यायालयानेही विकास आणि पर्यावरणीय चिंता यांचे सौहार्दपूर्ण सहअस्तित्व असणे आवश्यक आहे असे म्हटले आहे; परंतु हा समतोल साधताना पर्यावरणाची किंमत चुकवून विकास करता येणार नाही. आता यासाठी मुंबईकर नागरिक म्हणून आपण काय करू शकतो? तर, शाळा, महाविद्यालये आणि सोसायट्यांमध्ये खारफुटींचे महत्त्व आणि उष्णतेचे दुष्परिणाम यावर चर्चासत्रे आयोजित करणे, भरपाई वनीकरणाचे जिओ–टॅगिंग आणि सार्वजनिक वेबसाइटवर माहिती देण्याच्या उच्च न्यायालयाच्या आदेशाची तंतोतंत अंमलबजावणी करणे, दर चार महिन्यांनी अद्ययावत माहिती मागणे, आपल्या सोसायटीतील काँक्रीट काढून झाडांसाठी मातीची जागा सोडणे, छतावर आणि बाल्कनीत झाडे लावणे, पाणी आणि विजेचा काटकसरीने वापर करणे, आरटीआय, जनहित याचिका आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून अधिकाऱ्यांना जबाबदार धरणे अशा काही गोष्टींमधून आपण काही प्रमाणात का असेना, पण बदल घडवू शकतो. विकासाचा अर्थ फक्त गगनचुंबी इमारती आणि रस्त्यांचे जाळे असा होऊ शकत नाही. मुंबईला वाचवायचे असेल, तर खारफुटी, झाडे आणि स्वच्छ हवा हीच खरी सुरक्षा आहे आणि त्यामुळेच 'क्लायमेट ॲक्शन नाऊ' ही आता केवळ घोषणा राहिली नसून जगण्यासाठीची गरज बनली आहे.शेवटी, उच्च न्यायालयाने बजावल्याप्रमाणे, जर आज आपण थांबलो नाही, तर उद्या आपल्याला खरोखरच ऑक्सिजन सिलिंडर घेऊन जगावे लागेल. वेळ अजूनही गेलेली नाही आणि ती जाण्याची आपण वाट पाहता कामा नये.

# शेतीला बैलाविना पर्याय नाही!



कष्टाशिवाय मातीला आणि बैलाशिवाय शेतीला पर्याय नाही या लोकप्रिय सुवचनेप्रमाणे मातीशी जोडलेला आणि बैलाच्या कष्टावर आधारित असलेला शेतीचा पाया कधीही बदलू शकत नाही. त्यामुळे बैलाविना शेतीला मजा नाही हे अगदी खरे आहे. शेती आणि बैल यांचे नाते अतूट आहे. सध्या सर्रास ट्रॅक्टरच्या सहाय्याने शेती केली जात आहे; परंतु बैलांच्या सहाय्याने शेती केली जात होती त्यामध्ये खरी मजा असायची. शेतात मशागत करून चालणार नाही तर प्रत्यक्षात शेतात घाम गाळावा लागतो. शेतातील मातीशी एकरूप व्हायचे असेल तर बैलांच्या सहाय्याने नांगरणी केल्याने खऱ्या अर्थाने मातीशी एकरूप होता येते. यातूनच कष्टाचे महत्त्व समजते. त्यामुळे ट्रॅक्टरने शेती जरी केली तरी आजही आणि उद्या शेतीशी बैलांचे योगदान अबाधित राहणार आहे. हीच खरी आपल्या शेतीप्रधान देशातील शेतीची संस्कृती आहे. थंडी, ऊन आणि पाऊस यांची पर्वा न करता शेतकऱ्यांच्या खांद्याला खांदा लावून कष्टाची कामे करीत असतात. त्यामुळे बैल हा शेतकऱ्यांचा कष्टाचा साथीदार झाला आहे. आतापर्यंत बैलांच्या सहाय्याने शेतातील नांगरणी, कोळपणी, गुटा, मळणी आणि बैलगाडीने सामानाची वाहतूक करणे अशी विविध अवघड कष्टाची कामे केली जात होती. काही ठिकाणी अजूनही केली जातात. मात्र त्याचे प्रमाण कमी होत आहे. म्हणजे त्यावेळी शेतकऱ्यांचा खरा आधार बैल होता. शेतीतील आधुनिक तंत्रज्ञानामुळे बैलांची जागा ट्रॅक्टरने घेतली तरी बैलांची जागा कोणीही घेऊ शकत नाही. शेवटी बैल हे बैल असतात. शेतीचा विचार करता शेताच्या मातीशी जुळलेली त्यांची नाळ आणि शेतकरी राजाचे भावनिक नाते कमी झालेले नाही. शेतकऱ्यांच्या कुटुंबातील एक प्रमुख घटक असतो. बैल हे शेतीपुरते मर्यादित नसून बैलांमुळे ग्रामीण भागातील जीवनमान उंचावण्यास मदत झालेली आहे. त्यामुळे शेताच्या बांधावर गेल्यावर बैलांची आठवण येते. आपल्या राज्यात शेती क्षेत्रात बैलांचे अनन्यसाधारण महत्त्व आहे, उद्याही असणार आहे. शेतकरी बैलांच्या मदतीने शेतात काम करीत असताना माती आणि निसर्गाशी जिव्हाळा लागलेला आहे. नैसर्गिक संकटे आली तरी त्यांच्यामध्ये तडा गेलेला नाही किंवा जाणारही नाही. हा निसर्गाचा नियम आहे. शेतीची कामे झाल्यावर कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी शेतकरी बैलांचे पूजन करतात. तसे दरवर्षी बैलपोळा सण शेतकऱ्यांच्या वतीने उत्साहात साजरा केला जातो. या दिवशी बैलांना पाण्याने धुतले जाते. त्यानंतर त्यांचे अंग टॉवेलने पुसले जाते. त्यांच्या शिंगांना शेतकरी आपल्या आवडीप्रमाणे रंग लावतात. गळ्यात रंगीबेरंगी फुलांची माळ घालण्यात येते. घरात गोडधोड जेवण केले जाते. गोठ्यात जाऊन त्यांच्या डोक्याला टिळा लावून त्यानंतर आरती ओवाळून त्यांचे पूजन केले जाते. पूजन झाल्यावर केळीच्या पानातून त्यांना सुद्धा जेवण दिले जाते. त्या दिवशी त्यांना गोठ्यातच आराम करण्यासाठी दाव्याने बांधून ठेवतात. वेळच्या वेळी चारा आणि पाणी दिले जाते. म्हणजे याचा अर्थ असा होतो की, आपल्यापेक्षा मुक्या प्राण्यांना अधिक समजते. शेवटी काय मौनाची भाषा मौनालाच समजते. शेतीच्या कामासाठी बैलांचा वापर केला गेल्याने जमिनीची नांगरणी करीत असताना जमिनीची धूप कमी होते. त्यांच्या पायांनी माती बारीक होते. चिखलही शेतीलायक होतो. शेणाचा उपयोगही सेंद्रिय खत म्हणून वापर केला जातो. यामुळे जमिनीची सुपीकता दीर्घकाळ टिकून राहते तसेच प्रदूषण कमी होण्याला मदत होते. शेती उत्पादनाचा विचार करता पारंपरिक पद्धतीने शेती करत असल्याने आधुनिक पद्धतीपेक्षा कमी उत्पादन होऊ शकते. मात्र शेतीचा कस टिकून राहतो. जरी शेती उत्पादन कमी झाले तरी बैलांमुळे आपण पर्यावरणपूरक शेती करू शकतो. यात मानवी श्रमाचा वापर केला जात असून नैसर्गिक बी–बियाण्यांचा अर्थात स्थानिक बियाण्यांचा व शेण खताचा वापर केला जातो. त्यामुळे शेतकऱ्यांचे हात–पाय सुद्धा सुरक्षित राहतात. आता शेतीची कामे सुरू झालेली आहेत. शेतकरी जमिनीची नांगरणी ट्रॅक्टरने करू लागले आहेत. त्यामुळे शेतात शेतकऱ्यांचा आवाज एकदम बंद असल्याचा दिसतो. जेव्हा बैलांच्या सहाय्याने नांगरणी करीत होते तेव्हा जमीन नांगरताना शेतकरी ईरीरी..., पापारी... म्हणत असत. शेतकऱ्याच्या एका हातात रुमनी आणि एका हातात लिंगडीची काटी असायची. बैलांची नावे पण आकर्षक ठेवायची पाखऱ्या, पांढऱ्या, हौश्या, हरण्या, सोन्या, लाल्या अशी असायची. शेतकरी बैलाचे नाव घेऊन म्यार धर म्हटले की, तो आपोआप मेरे जवळ जायचा. त्यामुळे नांगरणी सुद्धा शेतीलायक व्हायची. कोपऱ्यात बैल उभे असले काय कोपरे फुलून दिसायचे. हीच खरी शेतकऱ्यांची शान आहे. आता जरी ट्रॅक्टरने शेती केली तरी बैलांशिवाय शेतीची कामे केली अशी वाटत नाहीत. तसेच बैलांच्या सहाय्याने नांगरणी केली जात होती त्यावेळी शेतकरी राजाला त्यात खरा आनंद मिळत होता. त्यामुळे बैलाविना शेतीला मजा नाही हे मात्र खरे आहे. आजचे कृषी जग हे यांत्रिकीकरणाच्या प्रभावाखाली असले तरी, बैलांच्या परंपरेत जपलेले ते सौंदर्य आणि तो जिव्हाळा यांत्रिक ट्रॅक्टरमध्ये कधीही सापडणार नाही. आधुनिकतेच्या रेट्यात आपण कदाचित वेगवान शेती करत असू, परंतु त्या वेगाच्या नादात आपण मातीचा पोत आणि बैलांशी असलेला भावनिक संवाद हरवून बसलो आहोत का, असा प्रश्न पडतो.

# अजून शर्यत संपलेली नाही



महिलांना समान संधी मिळायला हव्यात, याचे सर्वात प्रभावी उदाहरण म्हणजे सुधा मूर्ती यांचा टेल्को अर्थात टाटामधील प्रवेश. हा प्रसंग आजही खासगी कंपनीतील महिलांच्या सक्षमीकरणाचा महत्त्वाचा टप्पा मानला जातो. सुधा मूर्ती यांनी एका मुलाखतीत सांगितलेला हा किस्सा. टेल्कोने अभियंत्यांच्या भरतीसाठी जाहिरात प्रसिद्ध केली होती. मात्र, त्या जाहिरातीच्या शेवटी 'महिला उमेदवारांनी अर्ज करू नये' अशी अट नमूद करण्यात आली होती. ही जाहिरात पाहिल्यानंतर सुधा मूर्ती यांनी थेट टाटा समूहाचे तत्कालीन अध्यक्ष जे. आर. डी. टाटा यांना पत्र लिहिलं. त्या पत्रात त्यांनी स्पष्टपणे नमूद केलं की, देशातील जवळपास ५0 टक्के लोकसंख्या महिलांची असताना, केवळ लिंगाच्या आधारावर त्यांना नोकरीपासून दूर ठेवणे योग्य नाही. हे पत्र वाचल्यानंतर जे. आर. डी. टाटा यांनी त्यांना मुलाखतीसाठी बोलावलं. मुलाखतीदरम्यान त्यांनी सांगितलं की, ही नियुक्ती जमशेदपूर येथे होती. त्या काळी तेथे बहुतांश कर्मचारी पुरुष होते आणि महिलांसाठी आवश्यक निवास व इतर सुविधा पुरेशा उपलब्ध नव्हत्या, त्यामुळेच ही अट जाहिरातीत टाकण्यात आली होती. मात्र, सुधा मूर्ती यांनी कोणतीही भीती न बाळगता ही नोकरी स्वीकारण्याची तयारी दर्शवली. त्या वेळी त्यांना अमेरिकेत पीएच.डी. साठी जाण्याची संधीही होती. तरीही त्यांनी टेल्कोमध्ये रुजू होण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या या निर्णयामुळे टेल्कोमध्ये महिला अभियंत्यांसाठी दारे खुली झाली आणि पुढील अनेक महिलांना अभियांत्रिकी क्षेत्रात संधी मिळण्याचा मार्ग मोकळा झाला. अमेरिकेनं मला जी संधी दिली ती मला भारतातही मिळाली नसती यावर नूयी यांच्याशी कोणी सहमत आहे, तर कोणी सहमत नाही. पण ज्यावेळी एखादी महिला मग ती त्या पदास लायक असेल, तर तिला त्या पदावर सन्मानानं विराजमान करणारी मानसिकता तिथे जिवंत असणंही तितकंच महत्त्वाचं आहे. सूधा मूर्ती या आपल्या कंपनीत रुजू होण्यास सक्षम आहेत मात्र त्यांच्या सुरक्षिततेच्यादृष्टीने टाटा यांनी अधिक विचार केला. ही वैचारिक पातळी आज किती कंपन्यांमधील वरिष्ठांमध्ये असेल. महिला सक्षमच आहेत पण त्याची जाणीव प्रत्येक क्षेत्रातील पुरुषालाही असायला हवी. अर्थात आज नूयी यांनी मांडलेला मुद्दा चुकीचा नाही. महिलांचे नेतृत्व, शिक्षण आणि करिअरविषयी आणि त्यांच्या पदाविषयी बोलायचे तर टॉप–५०० कंपन्यांमध्ये केवळ ०.४ टक्के महिला सीईओ असल्याचे समोर आलंय. या पार्श्वभूमीवर सुधा मूर्ती यांची भूमिका अधिक महत्त्वाची ठरते. त्यांच्या मते, महिलांना शिक्षण, कौशल्यविकास आणि करिअरमध्ये पुरुषांप्रमाणे समान संधी मिळाल्या पाहिजेत. मात्र, केवळ महिला असल्यामुळे कोणालाही पद मिळू नये हे मान्य नाही. नेतृत्वाच्या संधी पात्रता, मेहनत आणि गुणवत्तेच्या आधारावर मिळायला हव्यात. आर्थिक स्वातंत्र्यामुळे आज महिलांचा आत्मविश्वास वाढला आणि नेतृत्वाच्या संधीही विस्तारत आहेत. पण हे देखील इतकच खरं की कुटुंबातील जबाबदाऱ्या, सामाजिक अपेक्षा आणि कार्यस्थळावरील अडचणी यामुळे अनेक महिला करिअरच्या मधल्या टप्प्यात मागे पडतात, याकडेही आपण लक्ष वेधायला हवं. कंपन्यांनी महिलांना टिकून राहता येईल, प्रगती करता येईल आणि नेतृत्वाच्या भूमिका स्वीकारता येतील, असे सकारात्मक आणि समावेशक कार्यपरिसर निर्माण करणे गरजेचे आहे. नूयी यांच्या वक्तव्यानंतर भारतीय कॉर्पोरेट क्षेत्रात लिंगवैविध्य आणि महिलांच्या नेतृत्वाचा मुद्दा केंद्रस्थानी आला. बोर्डरूममध्ये महिलांचे प्रतिनिधित्व वाढल्याचे चित्र दिसत असले, तरी सर्वोच्च निर्णयक्षम पदांवर महिलांची उपस्थिती अत्यंत कमी असल्याचे समोर आले. ही परिस्थिती दर्शवते की महिलांना बोर्डमध्ये स्थान मिळत असले, तरी सर्वोच्च नेतृत्वापर्यंत पोहोचण्याचा त्यांचा प्रवास अजूनही कठीण आहे. भारतातील कॉर्पोरेट क्षेत्रात महिलांच्या प्रतिनिधित्वावर नव्याने चर्चा सुरू झाली. भारतात अनेक यशस्वी महिला उद्योगनेत्या घडल्या असल्या, तरी त्या अपवादात्मक उदाहरणे असल्याचे वास्तव आकडेवारी स्पष्ट करते. फॉर्च्यून कंपन्यांच्या आढाव्यातून स्पष्ट झाले, की देशातील जवळपास निम्मी लोकसंख्या महिला असतानाही नेतृत्वाच्या सर्वोच्च पदांवर त्यांचे प्रतिनिधित्व अत्यंत कमी आहे. कंपनी कायदा २०१३ अंतर्गत प्रत्येक पात्र कंपनीने किमान एक महिला स्वतंत्र संचालक नियुक्त करणे बंधनकारक करण्यात आले. या निर्णयाचा सकारात्मक परिणाम दिसून आला. सीएफए इन्स्टिट्यूट इंडियाच्या माहितीनुसार बोर्डवरील महिलांचे प्रतिनिधित्व सुमारे १९ टक्क्यांपर्यंत पोहोचले. मात्र, या क्षेत्रात अजूनही मोठी दरी आहे. ४१ कंपन्यांमध्ये अजूनही एकही महिला स्वतंत्र संचालक नाही. २१६ कंपन्यांमध्ये केवळ नियमापुरती एक महिला संचालक आहे. तज्ज्ञांच्या मते, मुख्य समस्या बोर्डरूममध्ये नसून मध्यम आणि वरिष्ठ व्यवस्थापनाच्या स्तरावर आहे. महिलांना करिअरमध्ये टिकून राहण्यासाठी, नेतृत्व विकसित करण्यासाठी आणि समान संधी मिळण्यासाठी संस्थात्मक पातळीवर सक्षम धोरणे राबविणे अधिक आवश्यक आहे. माजी नेस्ले इंडिया व्यवस्थापकीय संचालक सुरेश नारायणन यांच्या मते, केवळ कोट्यावर आधारित नियुक्त्यांपेक्षा गुणवत्तेवर निवड प्रक्रियेला प्राधान्य दिले पाहिजे. कंपन्यांनी अशी कार्यसंस्कृती निर्माण करणे गरजेचे आहे, जिथे महिलांना नेतृत्वाच्या संधी नैसर्गिकरीत्या उपलब्ध होतील. कॉर्पोरेट भारताने बोर्डरूममध्ये महिलांसाठी दारे उघडली असली, तरी सीईओ आणि एमडीसारख्या सर्वोच्च पदांपर्यंत महिलांची संख्या वाढविण्यासाठी अजून मोठा पल्ला गाठायचा आहे.

### भोंदू चेहरा ..

मुश्किलीने अनावृत
होई भोंदूगिरी चेहरा
एखाद होईल फितूर
कडक शिष्य पहारा

पडद्याड खलप्रवृत्ती
झाकून ठेवते मोहरा
हळूचं निसटते खोटे
अफवा वारा भरारा

ताकदमिळे आगळी
राजाश्रय हा आसरा
जावाई होती उन्मत्त
खुर्चीवर बसे सासरा

बाबाश्रम बंदी शाळा
परिसरा तोचि दरारा
कुठूनही येईल गोळी
जपूनचं इकडेविहारा

अंधभक्त ते इतस्ततः
वेढाघातला परिसरा
बाबांच्या कारनाम्या
कोण घालेलकासरा

धाडस उघडतो तोंड
बाहेर पडतो पसारा
काळ्या कृत्या दिला
खणखर एक इशारा

आश्रमउध्वस्त करा
बाबा अस्त हो खरा
असल्या नराधमांचा
उतरून टाके नखरा

– हेमंत मुसरीफ पुणे.
९७३०३०६९९६

### हडप ..

इस्टेट मोक्यावरची
मना तळमळ तडप
अस्वस्थ होई सतत
कधी करतोयं हडप

ट्रस्ट एखाद बनवून
उघडहळूवार झडप
संधी साधून बरोबर
झट्कन घाल झडप

करे शिकार वाघाची
तयार करायचे उडप
राजरोस उजळमाथे
भक्ष्य करायचे गडप

बाहेर काढती लफडी
वेळेवर प्रकरणं दडप
मिंधे करायचे वाचाळ
खुबीने वापरावे पडप

काही नाठाळ तय्यार
घालून बसलेत मंडप
डोळ्यात अंजन घाले
चालले मिरची कांडप

कारवाईकरणारे स्वयं
बसे कसे का शटअप
चौकशीसमिती येईलं
लवकर सगळे आटप

विचारफक्तस्वार्थाचा
नसे जनसेवेची तडप
शोधा सच्चा नेताश्री
कुठे हरवलीयं तडफ

– हेमंत मुसरीफ पुणे.
९७३०३०६९९६.

### दिल्ली खास ..

नीतकरे दिल्ली वारी
वरिष्ठांचे होऊ खास
चार्टर्ड फ्लाईट करी
असह्यआता हव्यास
ईडी पिडा टळोजळो
टाळायचा तुरूंगवास
ड्रायक्लिन करा बुवा
आरोपांचा घाणवास
नेम नाही मुळी काही
कधी लावे गळ फास
खोके ठेवी नैवेद्याला
वेळका मग प्रसादास
खातेपिते मिळे खाते
सोडणारकुठे तुम्हांस
येणे जाणे रे कष्ट प्रद
दिल्लीतघेतो आवास
आत्तातरी सुरूवात रे
निवृत्तीप्रवृत्ती कशांस
माझ्यानंतर सत्तावास
हवामाझ्या परिवारांस
सोडणारं नाही खुर्ची
जोवर घे अंतिम श्वास
खाजगीत सांगूतुम्हांस
दिल्लीवरी अ विश्वास

– हेमंत मुसरीफ पुणे
९७३०३०६९९६

### विठु आस ..

पंढरपुरी चाले वारी
लागे माऊली ध्यास
झपाझपा गं पाऊले
लागली दर्शनाआंस
विठुच्या पायी लीन
हृदयांत विजनवास
सोडवेना गं पंढरपुर
कमी भासे सहवास
पापे माझी पोटीघेई
विठुरायांवर विश्वास
पुण्य कर्मे घडवून घे
ये परिमलशुध्दश्वास
मीठ झुणका भाकर
इतके हाती नैवेद्यास
प्रसाददेतो सकलांस
माझे निर्जळउपवास
वारी आता कष्ट प्रद
तव पायी द्या निवास
सेवा करी यथाशक्ती
सेवक तव कर खास
वेध लागी निर्वाणाचे
कसाअसे वैकुंठवास
पुण्य माझे तोकडे ते
कसाकरु मी हव्यास

– हेमंत मुसरीफ पुणे
९७३०३०६९९६

# लग्नाचं आमिष दाखवून लैंगिक शोषण

'महाभारत' मालिकेत भीमची भूमिका साकारून घराघरात पोहोचलेला आणि रणबीर कपूर स्टारर 'ब्रह्मास्त्र: पार्ट वन – शिवा'मध्ये झळकलेला अभिनेता सौरव गुर्जर सध्या वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. एका २९ वर्षीय महिलेने लग्नाचं आमिष दाखवून लैंगिक शोषण केल्याचा आरोप सौरव गुर्जरवर केला आहे. या तक्रारीनंतर पोलिसांनी त्याला मुंबई विमानतळावरून ताब्यात घेतलं. त्यानंतर दंडाधिकाऱ्यांसमोर हजर करण्यात आल्यानंतर सौरवला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

२९ वर्षीय महिलेची तक्रार

एएनआयच्या वृत्तानुसार, एका २९ वर्षीय महिलेने सौरव गुर्जरविरोधात लैंगिक शोषणाची तक्रार दाखल केली आहे. महिलेच्या आरोपानुसार, सौरवने तिच्याशी जवळीक वाढवत लग्नाचं आश्वासन दिलं आणि त्यानंतर तिचं लैंगिक शोषण केलं. महिलेच्या तक्रारीवरून गचीबोवली पोलिसांनी या प्रकरणाचा तपास सुरू केला. पोलिसांनी सौरवला मुंबई विमानतळावरून ताब्यात घेतल्यानंतर त्याला दंडाधिकाऱ्यांसमोर हजर केलं. न्यायालयाने त्याला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. महिलेने पोलिसांकडे दिलेल्या तक्रारीनुसार, २०२१ मध्ये तिची आणि सौरव गुर्जरची ओळख खर्पीर्सीरा या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर झाली. त्यानंतर दोघांनी एकमेकांना फोन नंबर दिले आणि थहरींी–र्ि विरून संवाद सुरू झाला. पुढे या मैत्रीचं रूपांतर प्रेमसंबंधात झाल्याचा महिलेचा दावा आहे. तक्रारीनुसार, २५ डिसेंबर २०२१ रोजी दोघांची प्रत्यक्ष भेट झाली. या भेटीनंतर सौरवने लग्नाचं आश्वासन देऊन तिचा विश्वास संपादन केल्याचा आरोप महिलेने केला आहे. पुढे याच आश्वासनाच्या आधारे तिचं लैंगिक शोषण करण्यात आल्याचा दावा तिने तक्रारीत केला आहे. या प्रकरणातील आरोपांची पोलिसांकडून चौकशी सुरू असून, तक्रारीतील दावे तपासातून कितपत सिद्ध होतात, हे पुढील तपासानंतर स्पष्ट होणार आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक शामसुंदर चितोडा यांनी **जगमित्र ऑफसेट भोकरदन नाका, संभाजीनगर ता.जि.जालना ४३१२०३ (महाराष्ट्र)** येथे छापून, दैनिक चकमक कार्यालय जालना येथे प्रसिध्द केले. पि.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी ✲ यांची राहील. **संपादक शामसुंदर चितोडा, कार्यकारी संपादक कैलास फुलारी** (जालना जिल्हा न्यायालयाअंतर्गत) RNI NO.MHMAR/26/A4110 **मो.न.९४२२७९६०८८, ९४०३४९४४२२**

पान १ व ४ वरुन

### जालना शहरातील नागरिकांचा

ते रामनगर आणि जालना ते नागेवाडी** या मार्गावर सिटी बससेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळे शहरातील नागरिकांना विविध भागांमध्ये जाण्या-येण्यासाठी अधिक सुलभ वाहतूक सुविधा मिळणार आहे. बससेवेच्या माध्यमातून नागरिकांना सवलती देण्याचा प्रयत्न

यावेळी बोलताना आमदार अर्जुनराव खोतकर म्हणाले की, नागरिकांचा प्रवास अधिक सोयीचा व्हावा आणि त्यांना बससेवेचा जास्तीत जास्त फायदा मिळावा, यासाठी सिटी बससेवा सुरू करण्यात आली आहे. नागरिकांना बसप्रवासात आणखी सवलती कशा देता येतील, यासाठीही प्रयत्न करण्यात येणार आहेत. जालना शहरात या बसेस दिवसभर चांगल्या पद्धतीने सुरू राहाव्यात, नागरिकांना वेळेवर सेवा मिळावी आणि पुढील काळात प्रवाशांची वाढती गरज लक्षात घेऊन आणखी बसगाड्या वाढविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे आमदार खोतकर यांनी सांगितले. सिटी बससेवेच्या संदर्भातील विषय आपण राज्याचे परिवहनमंत्री ना प्रताप सरनाईक यांचेकडे मांडला असता त्यांनी आपल्या प्रस्तावाला सकारात्मक प्रतिसाद देत सहमती दर्शविल्याचेही आमदार खोतकर यांनी यावेळी सांगितले.

जालना जिल्ह्याच्या विकासासाठी एकत्रितपणे काम करणार यावेळी माजी मंत्री रावसाहेब दानवे पाटील म्हणाले की, जालना शहरातील नागरिक आणि प्रवाशांच्या सोयीसाठी सुरू करण्यात आलेली सिटी बससेवा निश्चितच उपयुक्त ठरणार आहे. शहरातील विविध भागांमध्ये प्रवास करणाऱ्या नागरिकांना या बससेवेचा फायदा होईल. जालना जिल्ह्याच्या विकासासाठी आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या विचारांशी आणि प्रस्तावांशी आपण सहमत असल्याचे दानवे पाटील यांनी सांगितले. **केंद्रात आपण एक आहोत, राज्यात आपण एक आहोत आणि जालना जिल्ह्यातही आपण एकत्रच आहोत,** असे मत व्यक्त करत जालना जिल्ह्याच्या विकासासाठी समन्वयाने काम करण्याची भूमिका त्यांनी मांडली.

सिटी बसमध्ये रावसाहेब दानवे व आमदार अर्जुनराव खोतकर यांची सवारी

लोकार्पण सोहळ्यानंतर **मा. मंत्री रावसाहेब दानवे पाटील आणि आमदार अर्जुनराव खोतकर यांनी सिटी बसमधून सवारी करत बससेवेचा आनंद घेतला.** यावेळी दोन्ही नेत्यांनी जालना बसस्थानक ते गांधी चौका (चमन) पर्यंत बसमधून प्रवास केला. या प्रवासादरम्यान त्यांनी जालना आगारातील अधिकारी व कर्मचाऱ्यांशी संवाद साधत सिटी बससेवेबाबत माहिती घेतली. नागरिकांना नियमित, सुरक्षित आणि सुलभ बससेवा मिळावी, तसेच शहरातील विविध मार्गांवर बससेवेचा विस्तार करता यावा, याबाबतही यावेळी चर्चा करण्यात आली. सिटी बसमधून प्रवास करताना रावसाहेब दानवे पाटील आणि आमदार अर्जुनराव खोतकर यांनी उपस्थितांशी संवाद साधला. **जालना शहरातील नागरिकांसाठी सुरू झालेली ही बससेवा अधिक प्रभावीपणे सुरू राहावी आणि तिचा जास्तीत जास्त नागरिकांना लाभ मिळावा**, यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्यावर यावेळी भर देण्यात आला. यावेळी त्यांनी बससेवेची पाहणी करत अधिकारी व कर्मचाऱ्यांशी संवाद साधला. नागरिकांना चांगली, सुरक्षित आणि नियमित बससेवा मिळावी, यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याच्या सूचनाही त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

जालना शहरातील नागरिकांच्या गरजा लक्षात घेऊन आगामी काळात सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी सातत्याने पाठपुरावा सुरू ठेवणार असल्याचे आमदार खोतकर यांनी यावेळी सांगितले. मान्यवरांची उपस्थिती या लोकार्पण सोहळ्यास माजी आमदार अरविंद चव्हाण, शिवसेना संपर्कप्रमुख भास्कर आंबेकर, शिवसेना संपर्कप्रमुख पंडितदादा भुतेकर, युवासेना तेसचिव अभिमन्यू खोतकर, मनपा महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत, शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, शिवसेना शहरप्रमुख विष्णू पाचफुले, नगरसेविका दर्शना झोल-खोतकर, मनपा विरोधी पक्षनेते कमलेश खरे, नगरसेवक अश्विन आंबेकर, नगरसेवक संजय डुकरे पाटील, नगरसेवक अमोल ठाकूर, गटनेता नगरसेवक दीपक राठोड, दिनेश भगत,योगेश भगत, दुर्गेश काठोटीवाले,विजय जाधव,शुभम टेकाळे,नितीन जांगडे, सपकाळ विभाग नियंत्रक टकले,आगार प्रमुख जैवळ,जफर खान, संतोष रासवे, स्वप्नील भास्कर, अजिंक्य जैवळ, बसस्थानक प्रमुख अनिल राठोड, सरफराज खान, शेख मुजाहेद, अभिषेक काबलिये, नजीर शेख, अच्युतराव कदम, देवेंद्र बुंदेले, धनराज बटावाले, आकाश जगताप, अंकुश पाचफुले, अमोल राऊत, मनोज लाखोले, बिलाल सौदागर, आकाश जगताप प्रवीण फुके, भगु भगत ,रवींद्र देशपांडे, अशोक सांबरे ,किरण शिरसाट ,योगेश रत्नपारखे, विजाताई चौधरी, छायाताई कोळे ,विष्णू डोंगरे, संताजी वाघमारे ,राधाकिसन दाभाडे, शिवाजी शेळके, आदेश कोठेजा ,आकाश जगताप, गेंदालाल, लाल झुंगे राजकुमार कोंडाकोंडा अभिषेक काबलीये,पांडुरंग डोंगरे ,बाळू पाचरणे, महादेव वाघ ,नागेश डवले ,बाळू ढगे प्रमोद वाघमारे यांच्यासह जालना आगारातील अधिकारी, कर्मचारी, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. जालना शहरात सिटी बससेवा सुरू झाल्यामुळे नागरिकांना दैनंदिन प्रवासासाठी अधिक सुलभ आणि परवडणारा पर्याय उपलब्ध झाला असून, शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था मजबूत होण्यास या सेवेची मदत होणार आहे.

### पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांनी स्पष्ट केले.

पालकमंत्री पंकजाताई मुंडे म्हणाल्या की, महानगरपालिका, नगरपंचायती, मोठ्या ग्रामपंचायती तसेच दुर्गम व डोंगराळ गावांसाठी पिण्याच्या पाण्याचे स्रोत आतापासून निश्चित करावेत. या स्रोतांतील पाणीसाठ्याचे नियमित निरीक्षण करून आवश्यकतेनुसार पर्यायी स्रोत तयार ठेवावेत. उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करण्यासाठी शेती, उद्योग, मोठी बांधकामे आणि अन्य पाणीखाऊ वापरांचा आढावा घेऊन आवश्यक उपाययोजनांचा प्रस्ताव तयार करावा. टँकरद्वारे होणारा पाणीपुरवठा पारदर्शक आणि परिणामकारक ठेवण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करावा. प्रत्येक टँकरला जीपीएस प्रणाली जोडून पाणी प्रत्यक्ष गरजू नागरिकांपर्यंत पोहोचत असल्याची खात्री करावी, असे पालकमंत्री मुंडे यांनी सांगितले. – चारा उपलब्धतेसाठी स्वतंत्र कृती आराखडा तयार करा

जालना जिल्ह्यातील पशुधनाची संख्या, उपलब्ध चारा आणि संभाव्य तूट यांचा समावेश असलेला स्वतंत्र चारा कृती आराखडा तयार करावा. चारा डेपो अथवा चारा छावण्यांची आवश्यकता, जिल्ह्याची चारा स्वयंपूर्णता आणि अतिरिक्त चारा मिळविण्याचे स्रोत निश्चित करावेत. शेजारील जिल्ह्यांच्या जिल्हाधिकाऱ्यांशी समन्वय साधून तेथील चारा उपलब्धतेचा अभ्यास करावा, असेही त्यांनी निर्देशित केले.पाणी उपलब्ध असलेल्या भागांतील शेतकऱ्यांना चारा पिकांच्या लागवडीसाठी प्रोत्साहित करावे. गाळपेरा क्षेत्रांचा चारा उत्पादनासाठी उपयोग करण्याची व्यवहार्यता तपासून त्याबाबतचा निर्णय प्रस्ताव तयार करावा. चारा छावण्या अथवा अन्य उपायांसाठी राज्यस्तरीय निर्णय

पान १ व ४ वरुन

आणि निधीची आवश्यकता असल्यास शासनाकडे तातडीने प्रस्ताव सादर करावा, असे पालकमंत्री पालकमंत्री मुंडे यांनी सांगितले.

पिण्याचे पाणी, पशुधनासाठी पाणी आणि चारा या विषयांवर केंद्रित स्वतंत्र बैठक २८ ऑक्टोबर रोजी घेण्यात येणार आहे. या बैठकीसाठी जलस्रोतांचे लेखापरीक्षण, चारा नियोजन, संभाव्य पाणीटंचाईची गावे आणि आवश्यक उपाययोजनांची सविस्तर माहिती तयार ठेवण्याचे निर्देश पालकमंत्री मुंडे यांनी दिले.

जिल्हाधिकारी आशिमा मित्तल म्हणाल्या की, सर्व जलस्रोतांचे लेखापरीक्षण करून संभाव्य पाणीटंचाईची ठिकाणे निश्चित करण्याची कार्यवाही तातडीने पूर्ण करण्यात येईल. तसेच पिण्याचे पाणी व चारा उपलब्धतेवर विशेष लक्ष केंद्रित करून शेजारील जिल्ह्यांशी समन्वय साधण्यात येईल. जिल्ह्यात दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेता, सर्व संबंधित यंत्रणांनी आवश्यक पूर्वनियोजन करून उपाययोजना कराव्यात. जिल्ह्यातील सर्व पाण्याचे स्त्रोत शोधून त्यांची उपलब्धता व सद्यःस्थितीची माहिती संकलित करून ठेवावी. तसेच, पिक कापणी प्रयोगाच्या आधारेच शेतकऱ्यांना पीक विम्याचा लाभ मिळत असल्याने सर्व संबंधित यंत्रणांनी पिक कापणी प्रयोग गांभीर्याने व अचूकपणे पूर्ण करावेत. तालुकास्तरीय अधिकाऱ्यांनी टंचाईसंदर्भात बैठक घेऊन आवश्यक त्या उपाययोजनांचे पूर्वनियोजन करावे, अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या

### मुख्यमंत्री पशुधन उद्योजकता विकास प्रशिक्षण

करण्यात येते की, त्यांनी शासनाच्या या महत्त्वपूर्ण योजनेचा जास्तीत जास्त लाभ घेण्यासाठी पुढे यावे आणि पुढाकार घ्यावा. यशस्वीतेसाठी परिश्रम: कार्यक्रमाच्या व संपूर्ण प्रशिक्षण शिबिराच्या यशस्वीतेसाठी सतीश जारे, आनंद हिवाळे, निकिता काळे, अंकुश पटेकर, विष्णू कदम, पंडित सोनवणे, श्रीमती निमा खरात आणि अनुराधा लोखंडे यांनी विशेष परिश्रम घेतले.

### घनसावंगी येथे भारतीय

जालना जिल्हा निरीक्षक आदरणीय किशोर जोहरे यांनी उपस्थित पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले. जिल्हाध्यक्ष महेंद्र बनकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत जिल्हा व तालुका कार्यकारिणीने संघटनेच्या पुढील वाटचालीसंदर्भात विविध विषयांवर चर्चा केली.यावेळी जिल्हा पदाधिकारी शिवाजी गाडेकर, लक्ष्मण कोळे, मधुकर खरात, चंद्रकांत दिलपाक, भिमराव बनसोडे, बी डी पवार, गणेश वाघमारे, दत्ता चोरमारे,दिनकर खरात, अरविंद खरात यांच्यसह मंठा तालुका अध्यक्ष सखाराम कोळे, सरचिटणीस महेंद्र टेकूळे, परतूर तालुकाध्यक्ष रामचंद्र पानवले, कोशाध्यक्ष अंकुश लांडगे, घनसावंगी तालुकाध्यक्ष राजकुमार खरात, सरचिटणीस राहुल म्हस्के, अंबड तालुकाध्यक्ष उत्तमराव येडे, उपाध्यक्ष विनोद जाधव यांच्यासह सखाराम शिंदे, अरुण खंडागळे, मल्हारी वडमारे, शेषराव झोटे,समता सैनिक दल आदीची उपस्थिती होती. बैठकीमुळे जालना जिल्हा पूर्व विभागातील संघटनात्मक कार्याला अधिक गती देण्यासाठी पदाधिकाऱ्यांमध्ये उत्साह निर्माण झाला.

### मौलिक लेखन आणि भाषिक

करणारी भाषा नसून सोशल मीडियाच्या युगात ती अर्थार्जनाचे प्रभावी साधनही आहे. ग्रामीण विद्यार्थ्यांमध्ये प्रतिभा मोठ्या प्रमाणात असून त्यांनी मौलिक लेखन, गीतलेखन, काव्यलेखन यांसोबतच वाचन, चिंतन व मनन यांची सवय

पान १ व ४ वरुन

आत्मसात करून साहित्यनिर्मिती करावी, असे आवाहन त्यांनी केले. इलेक्ट्रॉनिक मीडिया आणि प्रिंट मीडियामध्ये रोजगाराच्या अनेकविध संधी उपलब्ध आहेत. आकाशवाणी, दूरदर्शन, चित्रपट, गीतलेखन आणि गायन यांसह विविध क्षेत्रांमध्ये भाषिक कौशल्याच्या माध्यमातून करिअरच्या संधी उपलब्ध असल्याचे त्यांनी सांगितले. मौलिक लेखन आणि भाषिक कौशल्याच्या माध्यमातून ग्रामीण विद्यार्थीही रोजगाराच्या संधी प्राप्त करू शकतात, असे त्यांनी प्रतिपादन केले.

अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. आनंद देशमुख म्हणाले की, हिंदी ही राजभाषा असून तिचे साहित्य विविध घटकांना आणि देशाला एकत्र बांधण्याचे कार्य करते. भाषा माणसाला जोडण्याचे महत्त्वपूर्ण माध्यम आहे. विद्यार्थ्यांनी हिंदीसह विविध भाषा आत्मसात करून आपल्या करिअरसाठी उपलब्ध असलेल्या विविध वाटांचा शोध घ्यावा, असे त्यांनी सांगितले.

यावेळी बासरीवादक श्री. योगेश पवार यांचे सुंदर बासरीवादन सादर करण्यात आले. हिंदी विभागाच्या वतीने आयोजित काव्यलेखन, कथालेखन, निबंधलेखन, भित्तीपत्रक, रांगोळी आदी विविध स्पर्धांतील विजेत्या विद्यार्थ्यांना पुरस्कार व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

रांगोळी स्पर्धा : प्रथम – अश्विनी उगले; द्वितीय – रूपाली गाडेकर; तृतीय – निकिता घायतडक; उत्तेजनार्थ – रोशनी उगले, चांदणी घायतडक, विशाखा घायतडक, वैष्णवी जगताप, पूजा वाघ, वनिता पवार.

निबंधलेखन स्पर्धा : प्रथम – साक्षी आनंदे, पायल मस्के, स्नेहा शिंदे.

कवितालेखन स्पर्धा : प्रथम – रूपाली गाडेकर, अंजना घुंगासे, वनिता पवार.

भित्तीपत्रक स्पर्धा : प्रथम – पूजा मोरे; तसेच उमेश घुंगासे, आशिष थोरात आणि कुणाल गायकवाड यांनी उल्लेखनीय कामगिरी केली.

यावेळी पत्रकार मुदस्सिर बेग आणि श्रीमती योगिता रथकर उपस्थित होते.

स्पर्धांचे परीक्षक म्हणून डॉ. बाळासाहेब सोनवणे, डॉ. भीमराव पुंडगे, डॉ. ज्ञानेश्वर खोजे, प्रा. खंडू नवखंडे,प्रा उदय पवार ,डॉ वाल्मीक मेश्राम,प्रा बाळासाहेब वरखडे, प्रा.देशमुख आणि डॉ.ऋषीबाबा शिंदे यांनी काम पाहिले.

कार्यक्रमाचे आभार डॉ.जया बागुल यांनी मानले, तर सूत्रसंचालन हिंदी विभागप्रमुख डॉ. कन्नूलाल विटोरे यांनी केले. कार्यक्रमास महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

### वसंत नगर येथील आदर्श गणेश

मार्गदर्शनानुसार, गणेशोत्सवाच्या काळात सर्व गणेश मंडळांच्या ठिकाणी जाऊन नागरिकांची आरोग्य तपासणी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या मोहिमेंतर्गत आरोग्य सेविका श्रीमती रंजना राठोड व आशा सेविका अनिता माने यांनी आदर्श गणेश मंडळात उपस्थित राहून नागरिकांची आरोग्य तपासणी केली, तसेच त्यांना आरोग्याविषयी मोलाचे मार्गदर्शन केले.

सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल आदर्श गणेश मंडळाच्या वतीने यंदा विविध सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांची मोठी रेलचेल पाहायला मिळत आहे. या धार्मिक उत्सवाला सामाजिक भान जोडत मंडळाने राबवलेल्या आरोग्य शिबिराचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. **मंडळाच्या पदाधिकाऱ्यांची उपस्थिती**

हे शिबिर यशस्वी करण्यासाठी आदर्श गणेश मंडळाचे अध्यक्ष अरुण राठोड, रामेश्वर चव्हाण, सचिन पवार, आकाश राठोड, नितीन पवार, अजय राठोड, प्रशांत चव्हाण, सुनील राठोड, अनिल राठोड, योगेश राठोड, करण राठोड आणि अमर राऊत यांच्यासह मंडळाच्या समस्त कार्यकर्त्यांनी व विश्वस्तांनी विशेष परिश्रम घेतले.

### २० क्विंटल तांदुळ

सचिन यादव तसेच संबंधित अधिकाऱ्यांच्या पथकाने केली. या

पान १ व ४ वरुन

प्रकरणी तहसील कार्यालयातील निरीक्षण अधिकारी (पुरवठा) महेश थेरे यांच्या तक्रारीवरून कदीम जालना पोलिस ठाण्यात जीवनावश्यक वस्तू अधिनियम १९५५ चे कलम ३ व ७ अन्वये गुन्हा क्रमांक ०५२४/२०२६ दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलिस हेड कॉन्स्टेबल सदाशिव विनायक राठोड करीत आहेत.

### गणेशोत्सवाच्या माध्यमातून

संवाद-२०२६' उपक्रमाचा उद्देश आहे. गणेशोत्सवाचे निमित्ताने आज दि. २१ सप्टेंबर रोजी अंबड येथील छत्रपती शिवाजी महाराज हाउसिंग सोसायटी हाऊसिंग सोसायटीतील श्री छत्रपती गणेश मंडळ आणि अंबड तालुक्यातील पारनेर येथील रामराज्य प्रतिष्ठान गणेश मंडळ येथे आज लोकसंवाद-२०२६ उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमांच्या माध्यमातून आरोग्य, पशुसंवर्धन आणि महिला बाल विकास विभागाच्या विविध योजनांची माहिती नागरिकांनी देण्यात आली. जिल्हा परिषद आरोग्य विभागाचे जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी डी. एस. बोराडे यांनी यावेळी आरोग्य विभागातील योजनांची माहिती दिली. तर महिला बाल विकास विभागाचे जिल्हा प्रकल्प समन्वय संतोष दाभाडे व जिल्हा समन्वयक आकाश भवर, तसेच पशुसंवर्धन विभागाचे पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. एस यु तांगडे यांनी माहिती दिली. यावेळी मंडळाचे अध्यक्ष कुणाल जाधव, मंजीत रामभाऊ गाडेकर यांच्यासह या कार्यक्रमास नागरिकांची उपस्थिती होती. सदरील लोकसंवाद कार्यक्रमास उत्तम प्रतिसाद मिळाला तसेच नागरिकांच्या शंका निराकरण करण्यात आले.

### श्रीमद भागवत कथा

महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या. पारंपरिक वेशभूषेतील महिलांची उपस्थिती, भक्तिगीतांचा निनाद, भगव्या पताका आणि उत्स्फूर्त जयघोषामुळे संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. शोभायात्रेतील भाविकांचा उत्साह आणि धार्मिक वातावरणाने जालन्यातील वातावरण भारावून गेले आहे. २६ सप्टेंबरपर्यंत दररोज दुपारी २ ते ६ या वेळेत चालणाऱ्या या सात दिवसीय भागवत कथा श्रावणाचा भाविकांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन भक्ती ज्ञानगंगा श्रीमद् भागवत कथा समिती आणि सकल हिंदू समाजाच्यावतीने करण्यात आले आहे.

### प्रॉपर्टी विक्रीच्या

मुले आणि एक मुलगी आहे. दोन्ही मुले लहान असून, त्यांच्या मुलीचे अवघ्या पंधरा दिवसांपूर्वीच लग्न झाले होते. त्यामुळे या घटनेने कुटुंबावर मोठा आघात झाला आहे. दरम्यान, हत्येच्या कारणाबाबत परिसरात वेगवेगळ्या चर्चा आणि तर्कवितर्क सुरू आहेत. मात्र, या चर्चांना अधिकृत दुजोरा मिळालेला नाही. प्रॉपर्टी व्यवहारातील पैशांचा वाद, पत्नीच्या चारित्र्यावरील संशय आणि प्रत्यक्ष हत्येमागील कारण यातील नेमका संबंध काय आहे, हे पोलिस तपास पूर्ण झाल्यानंतरच स्पष्ट होणार आहे.

### आ.बबनराव लोणीकर शेतकऱ्यांच्या

उपविभागीय कृषी अधिकारी श्री पोळ , तालुका कृषी अधिकारी श्रीशा साळवे तहसीलदार भालेराव, गटविकास अधिकारी कौशल पाटील, यांच्यासह भाजपा तालुका अध्यक्ष शत्रुघ्न कणसे जिल्हा सरचिटणीस रमेश भापकर युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष संपत टकले, संभाजी वारे, दिगंबर मुजमुले शहाजी राक्षे रवींद्र सोळंके तुकाराम सोळंके, माऊली तनपुरे ,

पान १ व ४ वरुन

संदीप तनपुरे, सुधाकर बेरगुडे, बंडू मानवतकर संभाजी घनवट, किरण अंभोरे जगदीश पडोळकर माधव सिंग जनकवार ज्ञानेश्वर बागल माऊली बागल गणेश मोहिते पांडुरंग आढाव राजेभाऊ भोंगाने दीपक आवाडे संदीप जाधव रामजी मरळ नवाब भाई रामप्रसाद जगदाळे अमोल गिरी सिद्धेश्वर मरळ हरिभाऊ मरळ विष्णू मरळ युसुफ भाई नदीम भाई गुलाब सावंत दत्ता डोईजड बाजीराव कासारे जीवन रेंगले गोपाल गोरे सतीश कुलकर्णी सुनील शिंदे तुकाराम चव्हाण बालासाहेब कापसे आयोध्या ताई जाधव, विष्णुपंत लिपणे विक्रांत लिपणे गजानन लिपणे दिनकरराव लिपणे अंकुशराव लिपणे संजयराव आढळकर शरद सोळंके सर्जेराव मानवतकर सचिन लिपणेनिवृत्ती राव सोळंके अशोकराव सोळंके रमेशराव सोळंके ज्ञानेश्वर सोळंके कल्याणराव सोळंके बाळू काका सोळंके हनुमंतराव सोळंके भाऊसाहेब सोळंके मनोहरराव तात्या सोळंके बाबाराव सोळंके रमेश रामराव सोळंके कुंडलिकराव सोळंके मारुती आबा सोळंके प्रल्हाद भाऊ सोळंके आबासाहेब सोळंके अमोल सोळंके सांडू पाटील जाधव मारुती गणेश सोळंके आबा सोळंके उपसरपंच गणेश सोळंके जीवन सोळंके अशोक सोळंके प्रमोद सोळंके गणेश दत्तराव सोळुंके रंगनाथ येवले भुजंगराव येवले अमोल सोळंके विनोद येवले, सखाराम लहाने बाळासाहेब ला आणि वशिष्ठला आणि देविदास खरात उमेश लहाने मुंजा लहाने खंडेराव लहाने योगेश लहाने, सुरेश जगताप लक्ष्मण जगताप आसाराम जगताप संदीप जगताप संजय जगताप अंकुश जगताप गोरख खरात ज्ञानोबा उबाळे पांडुरंग कुरधने विष्णू डोरमारे, सुधाकर अंभोरे, अरुण अंभोरे स्वप्निल अंभोरे शेख नसरुल्ला शेख सलाम उद्दीन बबन अंभोरे जुगल अंभोरे शाम अंभोरे कैलास अंभोरे बाबू भोईटे विकास चव्हाण शेख रहीम, प्रल्हाद सवणे गंगाराम लहाने अरविंद सवणे कैलास सवणे वसंत काटकर दत्ता सवने वसंत काटकर दत्ता सावने सोळंके रणजीत अनिल मस्के यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकऱ्यांची उपस्थिती होती.

### दुष्काळग्रस्त स्थिती

जाणीव करून देणारी घटना आहे. त्यामुळे प्रशासनाने प्रत्यक्ष शेतावर जाऊन परिस्थितीची पाहणी करून तातडीने दिलासा द्यावा, अशी अपेक्षा शेतकरी रामदास शिंदे व्यक्त करीत आहेत.

### पुणे-सोलापूर

बजावल्यानंतर ते उरुळी कांचन पोलीस ठाण्यात सहाय्यक फौजदार म्हणून कार्यरत होते. कर्तव्य बजावल्यानंतर घरी जात असताना झालेल्या या अपघातामुळे पोलीस दलात हळहळ व्यक्त होत आहे. दाभाडे यांच्या निधनाची माहिती मिळताच उरुळी कांचन पोलीस ठाण्यात आणि परिसरात शोककळा पसरली. त्यांच्या पार्थिवावर शिंदखेडा येथील मूळ गावी शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. पोलीस निरीक्षक विजयमाला पवार यांनी घटनेबद्दल दुःख व्यक्त केले असून, अपघाताचा तपास वेगाने सुरू असल्याचे सांगितले आहे. दरम्यान, उरुळी कांचन परिसरातील पुणे-सोलापूर महामार्गावर वारंवार अपघात होत असल्याने नागरिकांकडून चिंता व्यक्त केली जात आहे. अपघातप्रवण ठिकाणी पुरेशी प्रकाशयोजना, वेग नियंत्रणाची व्यवस्था, सुरक्षित पादचारी मार्ग आणि वाहतूक पोलिसांची नियुक्ती करण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

## वादातून मंडळाच्या अध्यक्षाला संपवलं,

मुंबई : गणेशोत्सवाच्या आनंदात आणि उत्साहात असताना मुंबईतील घाटकोपर पूर्व येथील कामराज नगर परिसरात एक अत्यंत धक्कादायक आणि खळबळजनक घटना घडली आहे. 'सेव्हन स्टार स्पोर्ट्स क्लब' गणेशोत्सव मंडळाच्या अध्यक्षाची भररस्त्यात धारदार चाकूने छातीत वार करून निर्घृण हत्या करण्यात आल्याची घटना समोर आली आहे. या दुर्दैवी घटनेमुळे संपूर्ण घाटकोपर परिसरात एकच शोककळा आणि तणावाचे वातावरण पसरले आहे.(नेमकी काय आहे घटना? प्राथमिक तपासातून मिळालेल्या माहितीनुसार, गणेशोत्सव मंडळाच्या एका कार्यकर्त्याला मारहाण केल्याचा जाब विचारल्याच्या रागातून आणि जुन्या वैमनस्यातून हा जीवघेणा हल्ला करण्यात आला आहे.१८ सप्टेंबर रोजी रात्री साडेआठच्या सुमारास, स्थानिक बीएमसी शाळेजवळील गणेशोत्सव मंडळाचा एक कार्यकर्ता तिथे उभा होता. रागाने का पाहिले? या छोट्याशा गैरसमजातून एका तरुणाने त्या कार्यकर्त्याला चापट मारली. या प्रकारची माहिती मिळताच मंडळाचे अध्यक्ष संबंधित तरुणाला जाब विचारण्यासाठी गेले. तिथून सुरू झालेल्या वादाचे रूपांतर हाणामारीत झाले. चाकूने छातीत वार करून संपवला जीव

वाद विकोपाला गेल्यावर आरोपीने आपल्या इतर काही साथीदारांना फोन करून घटनास्थळी बोलावून घेतले. हे सर्वजण तिथे जमले आणि त्यांनी मंडळाच्या अध्यक्षांशी वाद घालायला सुरुवात केली. वाद एवढा वाढला की, मुख्य आरोपीने आपल्या खिशातून धारदार चाकू काढून थेट अध्यक्षांच्या छातीत भोसकला. या अचानक झालेल्या प्राणघातक हल्ल्यात अध्यक्ष गंभीर जखमी झाले आणि त्यांचा मृत्यू झाला. गणेशोत्सवाच्या काळात अशा प्रकारच्या हिंसक घटनेमुळे सार्वजनिक सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, पोलीस या प्रकरणाचा अधिक सखोल तपास करत आहेत.

## अभिमानास्पद! टली कुमारच्या नावावर गिनीज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद

मुंबई: टॉलिवूड इंडस्ट्रीतील सुप्रसिद्ध दिग्दर्शक टली कुमार यांचा आज (२१ सप्टेंबर) वाढदिवस असतो. या खास दिवशी त्यांना आयुष्यातील सर्वात सुंदर गिफ्ट मिळालं आहे. त्यांना कोणी खास गिफ्ट दिलं नसून त्यांच्या नावे गिनिज बुक ऑफ रेकॉर्डमध्ये रेकॉर्ड नोंदवण्यात आला आहे. तो सुद्धा ऐन त्यांच्या वाढदिवशीच हा रेकॉर्ड रचण्यात आला आहे. दिग्दर्शक टली ह्यांना त्यांच्या वाढदिवशी गिनीज बुक ऑफ रेकॉर्ड्सकडून सर्टिफिकेट प्रदान करण्यात आलं आहे. टली यांचा आगामी चित्रपट 'राका'ने प्रदर्शनापूर्वीच गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्समध्ये प्रवेश केला आहे. यामुळे दिग्दर्शकांसाठी आजचा दिवस खास असणार आहे. सोमवारी, सन पिक्चर्सने इन्स्टाग्रामवर पोस्ट करत चाहत्यांना माहिती दिली की, 'राका'या चित्रपटाने गिनीज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये एक नवीन विक्रम प्रस्थापित केला आहे. निर्मात्यांनी सांगितले की, 'राका'ने रिअल-टाइममध्ये सर्वाधिक लोकांचे मोशन-कॅप्चर केल्याबद्दल गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड प्रस्थापित केला आहे. पोस्ट शेअर करताना कॅप्शन दिले की, इतिहास रचला आहे, हा एक जागतिक विजय आहे, जो भारतीय चित्रपटाला जागतिक स्तरावर घेऊन जातो. 'राका'ने एकाच वेळी ३७ कलाकारांचे मोशन-कॅप्चर करून, रिअल-टाइममध्ये सर्वाधिक लोकांचे मोशन-कॅप्चर करण्याचा गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड केला आहे. या ऐतिहासिक कामगिरीबद्दल अल्लू अर्जुन आणि टली यांना गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड्सचे प्रमाणपत्र मिळाले आहे. या पोस्टनंतर, मेकर्सकडून कशापद्धतीने त्यांनी फोटो कॅप्चर केले, याचा व्हिडिओ शेअर केला आहे. या व्हिडिओमध्ये परदेशी टीमसोबत लहान मुले एका क्शन सीक्वेन्सचे चित्रीकरण करताना दिसत आहेत. बीटीएस व्हिडिओपासून गिनीज वर्ल्ड रेकॉर्डपर्यंतच्या या प्रवासाने चाहत्यांची मने जिंकली आहेत. सोशल मीडियावर फॅन्सकडून चित्रपटाच्या टीमवर कौतुकाचा वर्षाव होत आहे. अल्लू अर्जुनने त्याच्या सोशल मिडिया हँडलवर टलीसोबतचा एक फोटो शेअर केला आहे. हा खास क्षण शेअर करताना अल्लू अर्जुनने कॅप्शनमध्ये लिहिले, माझे दिग्दर्शक टली गरू यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा. तुमच्यासारख्या दूरदृष्टी आणि क्षमतेच्या दिग्दर्शकासोबत काम करण्याची संधी मिळाल्याचा मला खूप अभिमान आहे. भविष्यात आणखी काही उत्तम गोष्टी करण्यासाठी उत्सुक आहे. अल्लू अर्जुनच्या ४४ व्या वाढदिवसानिमित्त, निर्मात्यांनी चित्रपटातील अभिनेत्याचा फर्स्ट लूक प्रदर्शित केला. या फर्स्ट लूकमध्ये अभिनेत्याचा चित्रपटातला बाल्ड लूक प्रेक्षकांसमोर आला. लूक पाहून फॅन्सला चित्रपटाची उत्सुकता आहे. टली दिग्दर्शित चित्रपटात अल्लू अर्जुनसोबत प्रसिद्ध बॉलिवूड अभिनेत्री दीपिका पदुकोण देखील महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहे.

# आ.बबनराव लोणीकर शेतकऱ्यांच्या बांधावर ; सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीर शेतकऱ्यांना लवकर मदत मिळवून देणार : आ. लोणीकर

परतूर । प्रतिनिधी :
परतूर तालुक्यात यावर्षी पावसाने ओढ दिल्याने शेतकऱ्यांसमोर निर्माण झालेल्या गंभीर संकटाची आमदार बबनराव लोणीकर यांनी प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पाहणी केली. तालुक्यातील यदलापूर शिवार, पिंपरखेडा कंडारी वाढोणा शिवार , वरफळ वरफळवाडी शिवार, शेलगाव, सुरूमगाव, पांडे पोखरी श्रीष्टी , दैठणा आदी गावांना भेटी देत त्यांनी नुकसानग्रस्त शेतशिवाराची पाहणी करून शेतकऱ्यांशी संवाद साधला आणि त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या.

या वेळी शेतकऱ्यांशी संवाद साधताना आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की, यावर्षी सलग सुमारे ४८ दिवस पाऊस न पडल्यामुळे शेतातील उभी पिके मोठ्या प्रमाणात करपली आहेत. सोयाबीन, कपाशी, मूग, उडीद यासह विविध पिकांचे नुकसान झाले असून, शेतकऱ्यांसमोर मोठे आर्थिक संकट निर्माण झाले आहे. पिकांसोबतच जनावरांच्या चारा व पाण्याचा प्रश्नही गंभीर स्वरूप धारण करणार असल्याचे आमदार लोणीकर लोणीकर यांनी सांगितले

शेतकऱ्यांनी घरातील किडुक मिडूक विकून बी-बियाणे, खते घेतली; मात्र आसमानी संकटामुळे शेतातील उभी पिके करपली. त्यामुळे केलेला खर्चही वाया जाण्याची परिस्थिती निर्माण झाली असून अस्मानी संकटामुळे शेतकरी मोठ्या आर्थिक अडचणीत सापडला असल्याचे



आमदार लोणीकर यांनी सांगितले. शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन प्रत्यक्ष परिस्थिती पाहिल्यानंतर या संकटाची तीव्रता लक्षात येत असल्याचे सांगत, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाकडून मदत मिळवून देण्यासाठी आपण स्वतः शासन स्तरावर पाठपुरावा करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

जनावरांच्या चारा-पाण्याचा प्रश्नही गंभीर पावसाअभावी केवळ खरीप पिकांचेच नुकसान झालेले नाही, तर जनावरांच्या चारा आणि पाण्याचा प्रश्नही गंभीर बनला आहे. ग्रामीण भागातील पशुधनाच्या दृष्टीने ही परिस्थिती चिंताजनक असून, या समस्येकडेही शासनाचे लक्ष वेधणार असल्याचे आमदार लोणीकर यांनी सांगितले.

नुकसानग्रस्त शेतीचे वस्तुनिष्ठ पंचनामे करून शासनाच्या निकषानुसार शेतकऱ्यांना आवश्यक ती मदत मिळावी, यासाठी संबंधित यंत्रणेशी समन्वय साधून पाठपुरावा केला जाईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

कर्जमाफी व वीजबिल माफीचा दिलासा; पुढे बोलताना आमदार बबनराव लोणीकर यांनी यावेळी सांगितले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. मुख्यमंत्र्यांनी पुढाकार घेत ३६ हजार ५८५ कोटी रुपयांची कर्जमाफी केल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच शेतकऱ्यांचे वीज बिल माफ करण्याचा निर्णयही शासनाने घेतल्याचे त्यांनी सांगितले. सध्याच्या अस्मानी संकटातही सरकार शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा मिळवून देण्यासाठी आपण स्वतः शासन स्तरावर प्रयत्न करत असून, लवकरच मदत जाहीर होण्यासाठी पाठपुरावा केला जाईल, अशी ग्वाही आमदार बबनराव लोणीकर यांनी दिली. शेतकऱ्यांच्या अडचणीच्या काळात त्यांच्या पाठीशी उभे राहून त्यांना शासनाची मदत मिळवून देण्यासाठी आपण सातत्याने प्रयत्नशील राहणार असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले. दरम्यान दुपारच्या वेळी शेलगाव येथील शेतकऱ्यांच्या बांधावर आमदार बबनराव लोणीकर यांच्यासह शेतकरी पदाधिकारी कार्यकर्ते यांनी ठेचा ठेचा भाकरी खाल्ली व आपण शेतकऱ्याच्या सोबत असल्याचे सांगितले यावेळी प्रशासनातील उपविभागीय अधिकारी पद्माकर गायकवाड, (पान ३ वर)

## श्रीमद भागवत कथा श्रवणाने मृत्यूचे भय नाहीसे होते:स्वामी गोविंददेवगिरीजी महाराज

जालना/प्रतिनिधी : मानवी जीवनातील सर्वात मोठे सत्य म्हणजे मृत्यू, परंतु या नश्वर देहाचा अंत होताना प्रत्येकाच्या मनात मृत्यूचे भय निर्माण होते. या भयावर मात करून आत्मिक मुक्ती मिळवण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे श्रीमद्भागवत कथेचे एकाग्र चित्ताने श्रवण करणे होय. जो व्यक्ती भागवताचे मनोभावे श्रवण करतो, त्याला काळ किंवा मृत्यूची भीती उरत नाही, हाच संदेश या कथेमधून मिळतो. ज्याप्रमाणे राजा परीक्षिताने पवित्र प्रौष्ठपदी पर्वामध्ये भागवत कथेचे श्रवण करून मोक्षाची प्राप्ती केली, त्याच पर्वात कथा श्रवण आणि चिंतन करण्याची संधी जालनेकरांना मिळाली ही परमात्म्याची कृपाच आहे, असे निरूपण श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासचे कोषाध्यक्ष तथा श्रीकृष्ण जन्मभूमी न्यास, मथुराचे उपाध्यक्ष प.पू. राष्ट्रीय संत गुरुदेव स्वामी गोविंददेवगिरीजी महाराज यांनी येथे केले. भक्ती ज्ञानगंगा श्रीमद् भागवत कथा समिती आणि सकल हिंदू समाजाच्यावतीने आयोजित आयोजित श्रीमद् भागवत कथेला रविवार दि.२० सप्टेंबर रोजी मंठा रोडवरील आईसाहेब लॉन्स येथे भव्य शोभायात्राने सुरुवात झाली, त्याप्रसंगी स्वामी गोविंददेवगिरीजी निरूपण करत होते.शोभायात्रेनंतर कथेचे मुख्य यजमान विष्णूकुमार चेचानी, आजचे दैनिक यजमान



घनश्याम गोयल आणि प्रसाद यजमान रवीकुमार झंवर यांच्या हस्ते महापूजा करण्यात आली. मंत्रोच्चार, शंखनाद आणि मंगलमय वातावरणात झालेल्या या महापूजेनंतर राष्ट्रीय संत स्वामी गोविंददेवगिरीजी महाराज यांच्या वाणीतून श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञाला प्रत्यक्ष प्रारंभ झाला. महाराज पुढे म्हणाले की, श्रीकृष्ण भगवद्गीतेत आणि भागवतात सांगतात की आत्मा अमर आहे; केवळ वस्त्र बदलावे तसा हा देह बदलतो. ही जाणीव कथेच्या श्रवणाने दृढ होते. संसारातील नश्वर गोष्टींविषयीची आसक्ती सुटल्याशिवाय मनाला खरी शांतता लाभत नाही. भागवत कथा भक्ताला ईश्वराच्या चरणी लीन होऊन भयरहित जीवन जगण्याची प्रेरणा देते. कलियुगात कठीण तपश्चर्या किंवा मोठे यज्ञ करणे प्रत्येकाला शक्य नाही; मात्र संतांच्या वाणीतून नामस्मरण आणि भागवत श्रवण केल्यास चित्त शुद्ध होऊन जन्म-मृत्यूच्या चक्रातून मुक्ती मिळते. शेवटी मुख्य यजमान, दैनिक यजमान आणि आजचे आरती यजमान अभय कुलकर्णी, अजित मानधना, अनिल पंच, अंजली नागोरी, अरुण मोहता, अर्जुन गेही, दीपक जयस्वाल, दुर्गाप्रसाद लड्डा, बंकटलाल खंडेलवाल, लक्ष्मीनारायण खंडेलवाल, लक्ष्मीनारायण मानधना यांच्या हस्ते आरती करण्यात आली.


(पान ३ वर)

## आज अंबड चौफुली येथे वंचित बहुजन आघाडीची महत्त्वपूर्ण बैठक

जालना/प्रतिनिधी : वंचित बहुजन आघाडीच्या संघटनात्मक बांधणीच्या अनुषंगाने जालना तालुक्यातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांची अति महत्त्वपूर्ण बैठक मंगळवार, दि. २२ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी १ वाजता ४८८ रेस्ट हाऊस, अंबड चौफुली येथे आयोजित करण्यात आली आहे. जालना : वंचित बहुजन आघाडीचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष राजेंद्र पातोडे यांच्या आदेशानुसार, जालना जिल्हा पश्चिम जिल्हाध्यक्ष डेव्हिड घुमारे यांच्या सूचनेनुसार आणि तालुकाध्यक्ष भानुदास साळवे यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक होणार आहे. बैठकीमध्ये ज्या गावांमध्ये अद्याप शाखा कमिट्या स्थापन झालेल्या नाहीत, त्या गावांमध्ये शाखा कमिटी स्थापन करण्याबाबत नियोजन करण्यात येणार आहे. तसेच प्रत्येक सर्कलमध्ये संघटनात्मक बांधणी मजबूत करण्यासाठी सर्कलनिहाय नियोजन करण्यात येणार आहे. या बैठकीस तालुक्यातील सर्व पदाधिकारी, सर्कल प्रमुख, गण अध्यक्ष तसेच शाखा अध्यक्ष यांनी आवर्जून उपस्थित राहावे, असे आवाहन तालुका महासचिव वैभव वानखेडे यांनी केले आहे. संघटन विस्ताराच्या दृष्टीने ही बैठक महत्त्वाची असल्याने संबंधित सर्व पदाधिकाऱ्यांनी वेळेत उपस्थित राहावे, असेही आवाहन करण्यात आले आहे.

## घाणीच्या साम्राज्याने सुंदर नगरमधील नागरीक हैराण!

जालना शहरातील सुंदरनगर परिसरातील सिद्धार्थ नगर येथे अस्वच्छतेचा प्रश्न गंभीर बनला असून, साचलेले सांडपाणी, घाणकचरा आणि डासांचा वाढता प्रादुर्भाव यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. परिसरात डेंग्यू आणि मलेरियाचा धोका वाढत असून, अनेक घरांमधील लहान बालके आजारी पडल्याचे स्थानिक नागरिकांनी सांगितले.
सुंदरनगरमधील सिद्धार्थनगर परिसरात रस्ते आणि नाल्यांची सुविधा नसल्याने सांडपाण्याचा निचरा होण्यासाठी योग्य व्यवस्था नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. परिणामी घाण पाणी अक्षरशः रस्त्यावरून वाहत असून, ठिकठिकाणी सांडपाणी साचून डबकी तयार झाली आहेत. या साचलेल्या पाण्यात डासांची उत्पत्ती होत असल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.
पाण्याचा निचरा करण्यासाठी काही नागरिकांनी आपल्या घरांसमोरच खड्डे खोदले आहेत. मात्र हे खड्डे भरल्यानंतर सांडपाणी पुन्हा रस्त्यावर येत असल्याने समस्या कायम राहत आहे.
त्यातच कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी योग्य व्यवस्था नसल्याने परिसरात अनेक ठिकाणी कचऱ्याचे ढीग साचले आहेत.
या अस्वच्छ वातावरणामुळे लहान बालकांसह नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत असल्याचा दावा स्थानिकांनी केला आहे. परिसरातील



समस्येबाबत वेळोवेळी स्वच्छता निरीक्षकांना माहिती देण्यात आली. मात्र, आज-उद्या करत अनेक दिवस उलटले तरी प्रत्यक्ष उपाययोजना झाल्या नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.
दरम्यान, महानगरपालिका प्रशासनाने या समस्येची तातडीने दखल घेऊन परिसरातील कचरा हटवावा, सांडपाण्याचा निचरा करावा तसेच उघड्या नाल्या आणि साचलेल्या पाण्याच्या ठिकाणी जंतुनाशक व डास प्रतिबंधक फवारणी करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.
आता महानगरपालिका प्रशासन या गंभीर स्वच्छता समस्येकडे किती गांभीर्याने पाहते आणि नागरिकांना दिलासा देण्यासाठी प्रत्यक्षात कोणत्या उपाययोजना करते, याकडे सुंदरनगर आणि सिद्धार्थ नगरवासीयांचे लक्ष लागले आहे.

## प्रॉपर्टी विक्रीच्या रकमेवरून लक्कडकोट येथील हत्या झाल्याची प्राथमिक माहिती

आज दिनांक २० रविवार रोजी दुपारी १ वाजता मिळालेल्या माहितीनुसार जालना शहरातील लक्कडकोट परिसरात शनिवारी रात्री कौटुंबिक वादातून घडलेल्या हत्येच्या घटनेने परिसर हादरला आहे. आफरीन नईमोद्दीन काझी (वय ३८) यांचा गंभीर हल्लयात मृत्यू झाला. पत्नीची हत्या केल्यानंतर पती नईमोद्दीन काझी स्वतःहून सदर बाजार पोलीस ठाण्यात हजर झाल्याची प्राथमिक माहिती आहे. पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले असून, या हत्येमागील नेमके कारण शोधण्यासाठी तपास सुरु केला आहे.
प्राथमिक माहितीनुसार, दोन दिवसांपूर्वी आफरीन आणि नईमोद्दीन या दाम्पत्याच्या मालकीची काही प्रॉपर्टी विक्री करण्यात आली होती. या व्यवहारापोटी नोटरीद्वारे त्यांना काही रक्कम टोकन स्वरूपात



मिळाली होती. ही रक्कम घेऊन दोघे घरी आल्यानंतर पैशाच्या कारणावरून त्यांच्यात वाद सुरु झाल्याची माहिती आहे. शनिवारी सायंकाळच्या सुमारास पुन्हा वाद विकोपाला गेल्याचे सांगण्यात येत आहे.
याच वादातून नईमोद्दीन याने रेडियम कट करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या कटरने आफरीन यांच्या गळ्यावर आणि हातावर गंभीर वार केल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. या हल्लयात आफरीन यांचा मृत्यू झाला. मात्र, हल्लयाचे नेमके कारण काय होते, याबाबत पोलिस तपासातूनच अधिकृत माहिती समोर येणार आहे.
दरम्यान, पोलिसांनी पती नईमोद्दीन काझी याला ताब्यात घेऊन अधिक चौकशी केली असता, पत्नीच्या चारित्र्यावर संशय असल्याने आपण हे कृत्य केल्याचे त्याने पोलिसांना सांगितल्याची प्राथमिक माहिती आहे. मात्र, प्रॉपर्टी विक्रीच्या टोकन रकमेवरून झालेला वाद, चारित्र्यावरील संशय की यामागे आणखी काही कारण होते, याचा तपास पोलिसांकडून केला जात आहे.
घटनेनंतर रात्रीच फॉरेन्सिक पथकाने लक्कडकोट येथील घटनास्थळी पाहणी करून हत्येशी संबंधित महत्त्वाचे पुरावे संकलित केले. सदर बाजार पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला असून, हत्येसाठी वापरण्यात आल्याचे सांगितले जाणारे कटर आणि इतर वस्तूंच्या अनुषंगानेही तपास केला जात आहे.
पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन शासकीय सामान्य रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठवला होता. आज रविवारी मृतदेहाचे शवविच्छेदन करण्यात येत असून, त्यानंतर मृतदेह नातेवाईकांच्या स्वाधीन करण्यात येणार असल्याची माहिती आहे.
घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी, सदर बाजार पोलीस निरीक्षक संदीप भारती, डीबी पथक प्रमुख सचिन सानप यांच्यासह पोलिस पथकाने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांकडून या प्रकरणाचा विविध अंगांनी तपास सुरू आहे.

## दुष्काळग्रस्त स्थिती : डोळ्यांसमोर करपले पीके; शेतकऱ्याने उभी कपाशी उपटून फेकली

परतूर प्रतिनिधी : परतूर तालुक्यातील शिरसगाव शिवारात पावसाने मोठा खंड दिल्याने खरीप पिकांना मोठा फटका बसला आहे. पावसाअभावी कपाशीचे पीक करपून गेले असून, कपाशीची मोठ्या प्रमाणात पातेगळ झाल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे.
शिरसगाव शिवारातील शेतकरी रामदास सुखदेव शिंदे यांनी मोठ्या कष्टाने आणि लहान लेकराप्रमाणे जपलेली उभी कपाशी पिकाची अवस्था डोळ्यांसमोर पाहवत नसल्याने अखेर स्वतःच्या हाताने पीक उपटून बांधावर फेकून दिले. पीक उपटताना त्यांच्या डोळ्यांतून अश्रूंच्या धारा वाहत होत्या. वर्षभराची मेहनत आणि केलेला खर्च डोळ्यांसमोर उद्ध्वस्त होत असताना आता पुढील दिवस कसे काढायचे, याची चिंता त्यांना सतावत आहे. पावसाच्या प्रदीर्घ खंडामुळे राज्यातील अनेक भागांत कापूस, सोयाबीनसह खरीप पिकांचे नुकसान होत असल्याचे अलीकडील वृत्तांतही समोर आले आहेत. सणासुदीचे दिवस जवळ आले असताना मुलाबाळांचा सण कसा साजरा करायचा, घरखर्च कसा भागवायचा आणि शेतीवर केलेला खर्च



कसा भरून काढायचा, असा गंभीर प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा ठाकला आहे. शासनाने तातडीने मदत करावी आता तरी शासनाने शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहावे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने प्रत्यक्ष आर्थिक मदत देऊन त्यांना उभारी द्यावी. कपाशीचे मोठे नुकसान झाले असून किमान एकरी ५० हजार रुपये मदत मिळावी, अशी अपेक्षा रामदास शिंदे यांनी व्यक्त केली. शेतकऱ्यांना वेळेत मदत मिळाली नाही तर आर्थिक संकट अधिक गंभीर होण्याची भीती त्यांनी व्यक्त केली. सध्याच्या परिस्थितीत नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या पिकांचे तातडीने पंचनामे करून शासनाने ठोस मदतीचा निर्णय घ्यावा, अशी मागणीही करण्यात येत आहे. शासनाच्या स्तरावर नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या पीक नुकसानीची, तत्काळ मदत उ्ह्ढ प्रक्रियेद्वारे करावी. उभी पिके हाताने उपटण्याची वेळ येणे, ही शेतकऱ्यांच्या आर्थिक संकटाची गंभीर (पान ३ वर)

## पुणे-सोलापूर महामार्गावर काळाचा घाला

पुणे : पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर भीषण अपघातात पोलीस कर्मचाऱ्याचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. उरुळी कांचन पोलीस ठाण्यात सहाय्यक फौजदार म्हणून कार्यरत असलेले गणेश रतन दाभाडे (वय ४९) यांचा अज्ञात वाहनाच्या धडकेत मृत्यू झाला. शुक्रवारी (१८ सप्टेंबर) मध्यरात्री सव्वाबारा वाजण्याच्या सुमारास श्रीकृष्ण मंगल कार्यालयासमोर, ग्रीन पार्क हॉटेलजवळ ही घटना घडली. मिळालेल्या माहितीनुसार, गणेश दाभाडे हे पोलीस ठाण्यातील काम आटोपून बाहेर पडले होते. त्यानंतर ते पुणे-सोलापूर महामार्ग ओलांडत असताना भरधाव वेगाने आलेल्या




अज्ञात वाहनाने त्यांना जोरदार धडक दिली. धडक इतकी जोरदार होती की दाभाडे गंभीर जखमी झाले आणि त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. अपघातानंतर वाहनचालक घटनास्थळावर न थांबता वाहनासह पसार झाला. त्यामुळे अपघातास कारणीभूत ठरलेल्या वाहनाचा आणि चालकाचा शोध घेण्याचे आव्हान पोलिसांसमोर आहे. याप्रकरणी पोलिसांकडून तपास सुरू करण्यात आला आहे.

गणेश दाभाडे हे मूळचे धुळे जिल्ह्यातील शिंदखेडा येथील रहिवासी होते. २००१ मध्ये त्यांनी पोलीस दलात प्रवेश केला होता. पुणे ग्रामीण पोलीस दलात विविध ठिकाणी सेवा (पान ३ वर)